




© BMM Marathi Shala eBook Team

# बृहन्महाराष्ट्र मंडळातील मराठी मातृभाषा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सचित्र कार्यपुस्तिका

## विश्वभारती पुस्तक दुसरी

मराठी भाषा कार्यपुस्तिका दुसरी आवृत्ती - २०२३
पहिली आवृत्ती - २०१४

**बृहन्महाराष्ट्र मंडळ २.० पुस्तक समिती**
**उत्तर अमेरिका**
**संपर्क:** shala@bmmonline.org

Age 9-10 eligible for level 2. Minimum two year gap between two level exams and/or 120/80 instruction hours are recommended. This helps to prepare the students better and overall studentship retains. Normally a teacher needs 120/80 hours minimum (6040 hours per academic year) to teach the entire syllabus (based on eBook of the particular level). Rarely do students grasp the syllabus in a shorter time. Age is approximate only. This varies on each student's progress, older aged students' progress fast for primary levels.


© BMM Marathi Shala eBook Team

## कार्यपुस्तिकेविषयी मनोगत

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वतीने महाराष्ट्राच्या बाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना मराठी शिकवण्यासाठी उपयोगी अशी विश्वभारती कार्यपुस्तिका प्रकाशित करताना आम्हाला फार आनंद होत आहे.

भाषा ही संस्कृतीशी निगडित असते. त्यामुळे मराठी संस्कृतीशी रोजचा संपर्क नसलेल्या विद्यार्थ्यांना मराठी कसे शिकवायचे याचा विशेष विचार करावा लागतो. यासाठी या स्वतंत्र कार्यपुस्तिकेचा खटाटोप.

BMM च्या सर्व शाळांसाठी जो एकसंध अभ्यासक्रम तयार केला गेला त्याच अभ्यासक्रमावर प्रस्तुत ही कार्यपुस्तिका आधारित आहे. ह्या कार्यपुस्तिकेमध्ये काल्पनिक कथा (fiction), माहितीपर उतारे (non-fiction), नाट्कली , बडबड गीते, कविता  असे अनेक मुलांच्या दृष्टीने योग्य साहित्यप्रकार समाविष्ट केले आहेत. विद्यार्थ्यांना अनेक विषयांशी निगडीत शब्दसंपदा देता यावी हा ह्यामागे उद्देश आहे. त्याचबरोबर निरनिराळ्या प्रसंगांचा वापर करून व्याकरणाचे प्रयोग शिकवणे, वर्गात विद्यार्थ्यांशी गप्पा मारण्यासाठी विषय पुरवणे हे देखील उद्देश आहेत. परंतु धड्यातली माहिती घोकून पाठ करून घेणे हा मात्र आमचा उद्देश मुळीच नाही. त्यामुळे शिक्षकांनी हे धडे तशा प्रकारे वापरू नयेत. विद्यार्थ्यांनी हे धडे पूर्णतः वाचावे परंतु परीक्षेतील प्रश्नपत्रिकांमध्ये धड्यातील माहिती किंवा पाठांतरावर भर दिला जाऊ नये अशी आमची अपेक्षा आहे.

ह्या कार्यपुस्तिकेमध्ये  विद्यार्थी प्रश्नांची उत्तरे  तिथल्या तिथेच लिहू शकतील. पालकांना मुलांची तयारी करून ठेवता  येईल. वर्षभरात शिकवलेला आणि उत्तरे लिहिलेला संपूर्ण अभ्यास एकाच ठिकाणी असेल तर  पाल्याची परीक्षेची तयारी



© BMM Marathi Shala eBook Team

करून घेणे सोयीचे होते हे गेल्या काही वर्षांच्या अनुभवातून लक्षात आले आहे. सतत संगणकाचा वापर मुलांनी टाळावा व पुस्तकाचा वापर करावा यासाठी केलेला प्रयत्न पालकांना नक्कीच आवडेल.

ह्या संपूर्ण प्रक्रियेत आमच्या बृहन्महाराष्ट्र कार्यकारिणीचे अध्यक्ष संदीप दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यपुस्तिका हा उपक्रम सुरु झाला.

शाळा संचालक सविता मोरे, समितीतील कार्यकर्त्या श्रुती पांडे, मयूरी नाईक, मीनल जोशी, अंजली भिडे, हर्षाला साधले, आरती भागवत, कादंबिनी धारप, अश्विनी देवधर ह्यांनी आपले योगदान दिले आहे. मुखपृष्ठ शीतल  रांगणेकर यांनी बनविले आहे. योगासनाचा पाठ श्रीकांत सबनीस, पुनम चिमुरकर व चारुलता जोशी यांनी तयार केला आहे. कार्यपुस्तिकेचे मुद्रितशोधन केले आहे , अश्विनी क्षीरसागर, कादंबिनी धारप, स्नेहल पिटके कुलकर्णी यांनी.

इ- बुक्सची  editable documents विनायक पर्वते यांनी उपलब्ध करून दिली.

कार्यपुस्तिकेसाठी हातभार लावणाऱ्या सगळ्यांचे मनःपूर्वक आभार!

विद्यार्थ्यांना वाचायला सोपे आणि रोचक वाटतील , त्यांच्या कल्पनेला चालना देतील आणि उत्कंठा वाढवतील असे  धडे लिहायचा आम्ही प्रयन्त केला आहे . मराठीचा अभ्यास हा मुलांसाठी आवडीचा विषय कसा होईल याचा आम्ही प्रयत्न केला आहे . हे करताना भाषेशी तडजोड न करता जास्तीत जास्त सकस मराठीचा वापर व्हावा ही आमची भूमिका आहे.  ही अवघड उद्दिष्टे सर्वार्थाने साध्य झालेली नाहीत याची आम्हाला पुरेपूर जाणीव आहे. त्यामुळे हे काम पूर्ण झाले नसून ही फक्त सुरुवात आहे असे आमचे मत आहे. या कामात सुधारणा करण्यासाठी सर्व शिक्षक, पालक आणि मराठी प्रेमींची आम्हाला मदत हवी आहे. आपल्या सूचना आम्हाला अवश्य कळवा. आम्ही त्यांचा पुढील आवृत्तीमध्ये निश्चित उपयोग करू.

बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका



© BMM Marathi Shala eBook Team

BMM shala ebook team

अनुक्रमणिका

## श्लोक पाठांतर, नियमित व्यायाम


| | |
|---|---|
| अनुक्रमणिका | 5 |
| सूर्य नमस्कार अष्टांग-अ प्रकार माहिती | 6 |
| १. अक्षर ओळख | 12 |
| स्वर (Vowels) | 12 |
| २. अक्षर ओळख | 17 |
| ३. आकडे ओळख | 21 |
| ४. बाळ हसले खुदकन | 24 |
| ५. आटपाट जंगलात | 28 |
| ६. देवाजीचे रूप | 31 |
| ७. अशी करा कवायत | 34 |
| ८. चम चम चमचमतंय | 39 |
| ९. वारा | 42 |
| १०. गुंडू आणि चेंडू | 48 |
| ११. माझ्या या दारातून | 52 |
| १२. हरवले आणि सापडले | 55 |
| १३. स्वप्नातला प्राणी | 61 |
| १४. कपिला आणि जेनी | 66 |
| १५. चवी | 73 |
| १६. कागद | 78 |
| १७. सुंदरी | 83 |
| १८. अश्शी सुट्टी सुरेख बाई | 90 |
| १९. माझी शाळा | 94 |




© BMM Marathi Shala eBook Team

२०. मला आवडते... ! 100
२१. पाहुणे 106
२२. पंख मला जर असते.. 111
२३. प्राण्यांचा मेळावा 115
२४. लाल कोंबडी 119
२५. मराठी महिने आणि सण 124
२६. निळूची करामत (नाटुकले) 128
२७. डोक्यातले गणित 134
२८. अशी ही नाती 139
२९. चला पाहू या ध्रुव तारा 143
३०. गणपती बाप्पा मोरया 149
३१. स्वराज्याची शपथ आणि तोरणा विजय 154
३२. मिठाचा सत्याग्रह 157
३३. रंगाचे गाणे 159
३४. वाळूचा किल्ला अवांतर वाचन 161
३५. रामायणातील गोष्टी 164
परिशिष्ट: मुळाक्षरे 167
परिशिष्ट: बाराखडी 168
परिशिष्ट: जोडाक्षरे 172

## सूर्य नमस्कार अष्टांग-अ प्रकार माहिती

**१. प्रणामासन :**योगा मॅटच्या पुढील बाजूस ताठ उभे रहा, पाय एकत्र ठेवा, शरीराचे वजन दोन्ही पायांवर सारखे ठेवा. छाती पुढे करा आणि खांद्यांना आराम द्या. दोन्ही तळहात एकत्र आणून प्रार्थना मुद्रेमध्ये उभे रहा.



© BMM Marathi Shala eBook Team

**२. ऊर्ध्व उत्तानासन** :श्वास घेताना हात वरती घ्या, दंड कानाच्या जवळ असू द्या. पाठीचा कणा मागे वाकवा. दृष्टी वर हातांच्या पंजाकडे स्थिर करा.

**३. हस्तपादासन :**श्वास सोडताना कंबरेपासून पुढच्या बाजूला पाठीचा कणा लांबवत खाली वाका. तळहात खाली जमिनीवर टेकवायचा व कपाळ गुढग्याला टेकवायचा प्रयत्न करा. दृष्टी जमिनीकडे ठेवा.

**४. अर्ध उत्तानासन** : श्वास घेताना पायाची बोटे जमिनीला टेकवा. पाठीचा कणा जास्तीत जास्त ताठ ठेवायचा प्रयत्न करा. दृष्टी समोर स्थिर करा.

**५. चतुरंग दंडासन :**श्वास सोडत तळहात जमिनीवर दाबून मागे उडी मारत किंवा हळूहळू पाय मागे घेत दोन्ही हाताची कोपरे वाकवून आपले संपूर्ण शरीर एका रेषेत आणा. फक्त दोन्ही तळहात आणि पायाची बोटे जमिनीला टेकलेली असावीत. दृष्टी नाकाच्या टोकावर स्थिर करा.

**६. ऊर्ध्वमुख श्वानासन:** श्वास घेत दोन्ही हात सरळ करत छाती दोन्ही हातांच्या मध्ये पुढे काढा. पायाची बोटे जमिनीला टेकवावीत. पाठीचा कणा मागे वाकवा. गुडघे जमिनीपासून उचलेले ठेवा. तळहाताने मॅट खाली दाबा. दृष्टी वर स्थिर करा.

**७. अधोमुख श्वानासन:** श्वास सोडत हात व गुढगे ताठ करा आणि कंबर उंच करा. दोन्ही हात, पाठ, दोन्ही पाय सरळ असूद्यात. दोन्ही हातांमध्ये आणि पायांमध्ये थोडे अंतर असूद्यात. दृष्टी नाभीकडे स्थिर करा.

**८. अर्ध उत्तानासन:** श्वास घेताना उडी मारत किंवा हळू हळू दोन्ही हात पायांच्या मध्ये ठेवा. पायाची बोटे जमिनीला टेकवा आणि समोर बघा. पाठीचा कणा जास्तीत जास्त ताठ ठेवायचा प्रयत्न करा. दृष्टी समोर स्थिर करा.

**९. हस्तपादासन:** श्वास सोडत तळहात जमिनीवर ठेवा व कपाळ गुढघ्याला टेकवायचा प्रयत्न करा. दृष्टी जमिनीकडे ठेवा.




© BMM Marathi Shala eBook Team

**१०. ऊर्ध्व उत्तानासन:** श्वास घेताना हात वरती घ्या, दंड कानाच्या जवळ असू द्या. पाठीचा कणा मागे वाकवा. दृष्टी वर हातांच्या पंजाकडे स्थिर करा.

**११. प्रणामासन:** श्वास बाहेर सोडताना दोन्ही तळहात छाती पुढे एकत्र आणून प्रार्थना मुद्रेमध्ये उभे रहा.

**नियमित सूर्य नमस्कार करण्याने मुलांना अनेक फायदे होतात.**

- मन एकाग्र होते, स्मरणशक्ती सुधारते.
- स्नायू बळकट होतात, शरीर सुदृढ होते.
- मनस्थिती शांत रहाते, शरीराची प्रतिकारशक्ती वाढते.

| १. प्रणामासन | २. ऊर्ध्व उत्तानासन | ३. हस्तपादासन |
|---|---|---|
|  |  |  |
| ४. अर्ध उत्तानासन | ५. चतुरंग दंडासन | ६. ऊर्ध्वमुख श्वानासन |
|  |  |  |
| ७. अधोमुख श्वानासन | ८. अर्ध उत्तानासन | ९. हस्तपादासन |



© BMM Marathi Shala eBook Team

| | | |
|---|---|---|
|  |  |  |
| १०. ऊर्ध्व उत्तानासन | ११. प्रणामासन | |
|  |  | |



© BMM Marathi Shala eBook Team

| | |
|---|---|
| <br> | **मार्जारासन** करण्याची पद्धत:**१.** मांजरीप्रमाणे चार पायांवर हातांच्या आणि गुढघ्याच्या साहाय्याने उभे राहा. **२.** मनगट खांद्याच्या सरळ रेषेत खाली आणि गुडघे मांड्यांच्या सरळ रेषेत ठेवा.<br>**३.** दृष्टी सरळ ठेवा.<br>**४.** आता हळूहळू श्वास आत घेत हनुवटी वर उचला, नाभीला खालच्या दिशेला ढकला आणि पृच्छाहाडाला वर उचला.<br>**५.** इथे थोडा वेळ रहा आणि दीर्घ श्वास घ्या.<br>**६.** आता हळूहळू श्वास सोडत हनुवटी छातीकडे आणा, पाठीची कमान करा आणि नितंबाला सैल सोडा.<br>**७.** या स्थितीत थोडा वेळ रहा.<br>**८.** श्वास घेण्याची आणि सोडण्याची क्रिया पाच ते सहा वेळेला करून पूर्वस्थितीत या .<br>**मार्जारासन करण्याचे फायदे:**<br>**१.** मनगट आणि खांद्यांना बळकटी येते .<br>**२.** पाठीचा कणा लवचिक बनवण्यास मदत होते.<br>**३.** रक्ताभिसरण वाढण्यास मदत होते<br>**४.** पचनक्रिया सुधारून पचनशक्तीमध्ये वाढ होते. |



© BMM Marathi Shala eBook Team

<table>
<tr>
<td></td>
<td>
अर्धमत्स्येंद्रासन करण्याची पद्धत:<br>
१. पाय पसरून दंडासनात बसा. हाताने जमिनीवर हलके दाबा आणि पाठ ताठ ठेवा.<br>
२. डावा पाय वाकवा आणि डाव्या पायाची टाच उजव्या हिपजवळ ठेवा (किंवा डावा पाय सरळ देखील ठेवू शकता).<br>
३. उजवा पाय समोर डाव्या गुडघ्याच्या शेजारी ठेवा.<br>
४. डाव्या हाताचे कोपर उजव्या गुडघ्यावर आणि उजवा हात मागे ठेवा.<br>
५. कंबर, खांदे आणि मान उजवीकडून वळून उजव्या खांद्यावर बघा.<br>
६. पाठीचा कणा सरळ ठेवा.<br>
७. दीर्घ, खोल श्वास घेत ३०/६० सेकंद ही स्थिती कायम ठेवा.<br>
८. श्वास सोडताना आधी उजवा हात सोडा, नंतर कंबर, नंतर छाती आणि शेवटी मान. आरामात सरळ बसा.<br>
९. दुसऱ्या बाजूने प्रक्रिया पुन्हा करा.<br>
अर्धमत्स्येंद्रासन करण्याचे फायदे:<br>
१. पाठीचा कणा मजबूत होतो<br>
२. छातीचा विस्तार करून, फुफ्फुसांना योग्य प्रमाणात ऑक्सिजन मिळतो. ३. पाठदुखीपासून आराम मिळतो.<br>
४. हात, खांदे, पाठीचा वरचा भाग आणि मान यांचा ताण कमी होतो.
</td>
</tr>
</table>



© BMM Marathi Shala eBook Team

# १. अक्षर ओळख

## स्वर (Vowels)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ**<br>(a) | **आ**<br>(aa) | **इ**<br>(i) | **ई**<br>(ee) | **उ**<br>(u) | **ऊ**<br>(oo) |
| ए<br>(e) | ऐ<br>(ai) | ओ<br>(o) | औ<br>(au) | अं<br>(am) | अ:<br>(aha) |
| | | **ऋ**<br>ru | | | |

**खाली स्वर लिहायचा सराव करा.**


© BMM Marathi Shala eBook Team

## जोड्या जुळवा:

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अळी | आठ | एक | ओठ | इतर | ऊस |
| इ | ओ | ऊ | अ | इ | आ |

## व्यंजन (consonants)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **क**<br>(ka) | **ख**<br>(kha) | **ग**<br>(ga) | **घ**<br>(gha) | **ङ**<br>(nga) |
| **च**<br>(cha) | **छ**<br>(chha) | **ज**<br>(ja) | **झ**<br>(za) | **ञ**<br>(nya) |
| **ट**<br>(Ta) | **ठ**<br>(Thha) | **ड**<br>(Da) | **ढ**<br>(Dha) | **ण**<br>(Na) |
| **त**<br>(ta) | **थ**<br>(tha) | **द**<br>(da) | **ध**<br>(dha) | **न**<br>(na) |
| **प**<br>(pa) | **फ**<br>(pha) | **ब**<br>(ba) | **भ**<br>(bha) | **म**<br>(ma) |
| **य**<br>(ya) | **र**<br>(ra) | **ल**<br>(la) | **व**<br>(va) | **श**<br>(sha) |
| **ष**<br>(Sha) | **स**<br>(sa) | **ह**<br>(ha) | ळ<br>(La) | |
| **क्ष**<br>(kSha) | **ज्ञ**<br>(dnya) | **त्र**<br>(tra) | | |


© BMM Marathi Shala eBook Team

**रिकाम्या जागा भरा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क | | ग | | |
| | | ज | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | ळ | | | |

## बाराखडी (Syllables)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| क (ka) | का (kaa) | कि (ki) | की (kee) | कु (ku) | कू (koo) |
| के (ke) | कै (kai) | को (ko) | कौ (kau) | कं (kam) | क: (kaha) |



© BMM Marathi Shala eBook Team

**वरील क ची बाराखडी लिहा.**

______________________________

______________________________

______________________________

______________________________

**<u>वाचा</u>**

कडू,   कापड, किनारा,   कुमार, कोण, कौतुक, कूळ, कंठ

क ने सुरु होणारे पाच शब्द लिहा.

____________________

____________________

____________________





____________________

____________________



© BMM Marathi Shala eBook Team


# २. अक्षर ओळख

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **क** |  | **कान** | **ख** |  | **खिडकी** | **ग** |  | **गणपती** |
| | | | | | | | | |
| **घ** |  | **घर** | च |  | **चमचा** | छ |  | **छत्री** |
| | | | | | | | | |
| **ज** |  | **जिराफ** | झ |  | **झोप** | ट |  | **टोपी** |
| | | | | | | | | |
| **ठ** |  | **ठोसा** | ड |  | **डोके** | ढ |  | **ढग** |
| | | | | | | | | |





© BMM Marathi Shala eBook Team

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ण |  | बाण | त |  | तारा | थ |  | थांबा |
| द |  | दात | ध |  | धूर | न |  | नाक |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प |  | पळणे | फ |  | फुगा | ब |  | बटाटा |
| | | | | | | | | |
| भ |  | भोपळा | म |  | माकड | य |  | याक |
| | | | | | | | | |
| र |  | रडणे | ल |  | लिंबू | व |  | विमान |



© BMM Marathi Shala eBook Team

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| श |  | शिडी | ष |  | षटकोन | स |  | ससा |
| ह |  | हत्ती | ळ |  | डोळा | क्ष |  | पक्षी |
| ज्ञ |  | ज्ञानेश्वर | | | | | | |


© BMM Marathi Shala eBook Team

**शब्द वाचा:**

आई आग आज अंग एक ऐक ओठ ओळ अंत अग आण ऊठ आपण
कर कर कप खत खण गर गड गड घर चल चढ छत जग जर ढग नख नट पळ
पण फळ बघ मज मग रस हस क्षण

**तोंडी सराव:** वरील शब्द वापरून वाक्ये तयार करा.

~~~~~



© BMM Marathi Shala eBook Team
~~~~~

## ३. आकडे ओळख

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ११ | २१ | ३१ | ४१ | ५१ | ६१ | ७१ | ८१ | ९१ |
| २ | १२ | २२ | ३२ | ४२ | ५२ | ६२ | ७२ | ८२ | ९२ |
| ३ | १३ | २३ | ३३ | ४३ | ५३ | ६३ | ७३ | ८३ | ९३ |
| ४ | १४ | २४ | ३४ | ४४ | ५४ | ६४ | ७४ | ८४ | ९४ |
| ५ | १५ | २५ | ३५ | ४५ | ५५ | ६५ | ७५ | ८५ | ९५ |
| ६ | १६ | २६ | ३६ | ४६ | ५६ | ६६ | ७६ | ८६ | ९६ |
| ७ | १७ | २७ | ३७ | ४७ | ५७ | ६७ | ७७ | ८७ | ९७ |
| ८ | १८ | २८ | ३८ | ४८ | ५८ | ६८ | ७८ | ८८ | ९८ |
| ९ | १९ | २९ | ३९ | ४९ | ५९ | ६९ | ७९ | ८९ | ९९ |
| १० | २० | ३० | ४० | ५० | ६० | ७० | ८० | ९० | १०० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एक | ११ | अकरा | २१ | एकवीस | ३१ | एकतीस | ४१ | एकेचाळीस |
| २ | दोन | १२ | बारा | २२ | बावीस | ३२ | बत्तीस | ४२ | बेचाळीस |
| ३ | तीन | १३ | तेरा | २३ | तेवीस | ३३ | तेहेतीस | ४३ | त्रेचाळीस |
| ४ | चार | १४ | चौदा | २४ | चोवीस | ३४ | चौतीस | ४४ | चव्वेचाळीस |
| ५ | पाच | १५ | पंधरा | २५ | पंचवीस | ३५ | पस्तीस | ४५ | पंचेचाळीस |
| ६ | सहा | १६ | सोळा | २६ | सव्वीस | ३६ | छत्तीस | ४६ | सेहेचाळीस |
| ७ | सात | १७ | सतरा | २७ | सत्तावीस | ३७ | सदतीस | ४७ | सत्तेचाळीस |
| ८ | आठ | १८ | अठरा | २८ | अठ्ठावीस | ३८ | अडतीस | ४८ | अठ्ठेचाळीस |
| ९ | नऊ | १९ | एकोणीस | २९ | एकोणतीस | ३९ | एकोणचाळीस | ४९ | एकोणपन्नास |
| १० | **दहा** | २० | **वीस** | ३० | **तीस** | ४० | **चाळीस** | ५० | **पन्नास** |



© BMM Marathi Shala eBook Team

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५१ | एकावन्न | ६१ | एकसष्ट | ७१ | एकाहत्तर | ८१ | एक्याऐंशी | ९१ | एक्याण्णव |
| ५२ | बावन्न | ६२ | बासष्ट | ७२ | बाहत्तर | ८२ | ब्याऐंशी | ९२ | ब्याण्णव |
| ५३ | त्रेपन्न | ६३ | त्रेसष्ट | ७३ | त्र्याहत्तर | ८३ | त्र्याऐंशी | ९३ | त्र्याण्णव |
| ५४ | चौपन्न | ६४ | चौसष्ट | ७४ | चौऱ्याहत्तर | ८४ | चौऱ्याऐंशी | ९४ | चौऱ्याण्णव |
| ५५ | पंचावन्न | ६५ | पासष्ट | ७५ | पंचाहत्तर | ८५ | पंचाऐंशी | ९५ | पंचाण्णव |
| ५६ | छप्पन्न | ६६ | सहासष्ट | ७६ | शहात्तर | ८६ | शहाऐंशी | ९६ | शहाण्णव |
| ५७ | सत्तावन्न | ६७ | सदुसष्ट | ७७ | सत्याहत्तर | ८७ | सत्याऐंशी | ९७ | सत्याण्णव |
| ५८ | अठ्ठावन्न | ६८ | अडुसष्ट | ७८ | अठ्ठ्याहत्तर | ८८ | अठ्ठ्याऐंशी | ९८ | अठ्ठ्याण्णव |
| ५९ | एकोणसाठ | ६९ | एकोणसत्तर | ७९ | एकोणऐंशी | ८९ | एकोणनव्वद | ९९ | नव्याण्णव |
| ६० | **साठ** | ७० | **सत्तर** | ८० | **ऐंशी** | ९० | **नव्वद** | १०० | **शंभर** |

| | | | |
|---|---|---|---|
| २०० | दोनशे | १०,००० | दहा हजार |
| ३०० | तीनशे | १००,००० | एक लाख |
| ४०० | चारशे | १०,००,००० | दहा लाख |
| ५०० | पाचशे | | |
| ६०० | सहाशे | | |
| ७०० | सातशे | | |
| ८०० | आठशे | | |
| ९०० | नऊशे | | |
| १००० | एक हजार | | |



© BMM Marathi Shala eBook Team

**स्वाध्याय:**

**1)** टेबलाला पाय किती?__________

**2)** रावणाला डोकी किती? ________

**3)** अलीबाबा आणि चोर किती?________

**4)** गणपती बाप्पाचा नैवेद्य मोदक किती? ________

**5)** सर्व मिळून कौरव किती?__________

**शिक्षकांसाठी..**

**समाविष्ट अभ्यासक्रम:** क्रमवाचक आकडे


**उपयुक्त सूचना:**

आकड्यांचा क्रम वापरून कोडी किंवा खेळ घ्यावेत. उदा. बिंगो



© BMM Marathi Shala eBook Team

# ४. बाळ हसले खुदकन





पहिला घास चिऊचा
आणि दुसरा घास माऊचा

तिसरा घास आईचा
आणि चौथा घास बाबांचा





पाचवा घास आजीचा
आणि सहावा घास आजोबांचा

पोट भरले पटकन
बाळ हसले खुदकन

-वसुंधरा पर्वते



~~~~~



© BMM Marathi Shala eBook Team
~~~~~

**वाक्यात उपयोग करा:**

| |
|---|
| घास: one mouthful food<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| पटकन: लवकर<br>------------------------------------------------------------------------------------------- |

**स्वाध्याय:**

**१.** पहिला घास कुणाचा?

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------

**२.** सहावा घास कुणाचा?

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------

**३.** बाळ का हसले?

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**४.** पहिला, दुसरा असे २० पर्यंत आकडे लिहा.

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------




--------------------------------------------------------------------------------------------


**५.** कोणता नंबर कुणाचा? क्रमवाचक अंक वापरून लिहा.

पहिला चेंडू दुसरी माळ ________ अंगठी ________ बाळ

________वही ________ घर ________ ससा ________ जिराफ


________सिंह ________ हत्ती ________ लांडगा ________ माकड


     






© BMM Marathi Shala eBook Team







---

**समाविष्ट अभ्यासक्रम:** क्रमवाचक आकडे

**उपयुक्त सूचना:**

- ५ पासून पुढचे सर्व क्रमवाचक शब्द आकड्याला वा, वी, वे प्रत्यय लावून तयार होतात. उदा. आठवा मुलगा, सहावी गाय, पाचवे झाड
- मुलांनी फक्त १ ते ४ - पहिला, दुसरा, तिसरा, चौथा लक्षात ठेवले तरी पुरते.
- प्रत्यय लावताना वस्तूचे लिंग ओळखून योग्य तो प्रत्यय लावावा.
  उदा. पुल्लीग / स्त्रीलिंग / नपुंसकलिंग  पहिला / पहिली / पहिले,
  चौथा / चौथी / चौथे , पाचवा / पाचवी /पाचवे
- प्रत्यय लावताना कधी कधी शब्दात थोडासा बदल होतो. झालेला बदल समजावून सांगा. उदा: वीस - विसावा, नऊ - नववे

~~~~~




© BMM Marathi Shala eBook Team
~~~~~

# ५. आटपाट जंगलात



आटपाट जंगलात भरली शाळा
सिंहाने शेपटीने पुसला फळा




हत्तीने काढली बाराखडी
अस्वल बसले मारून उडी




माकडाला येईना बसता ताठ
म्हणून कोल्ह्याने शिकवले पाठ



उंटाने पुस्तक धरले जवळ
त्याच्या मानेला लागली कळ





नंतर जिराफाची लांबवून मान
माणसाची चित्रे काढली छान

लबाड लांडगा म्हणाला उठून
एवढी माणसे आली कुठून





वाघोबा बोलले पळा रे पळा
माणसे भरली आणि सुटली शाळा






© BMM Marathi Shala eBook Team

**वाक्यात उपयोग करा:**

| |
|---|
| फळा: Black or whiteboard<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| लबाड: लुच्चा, dishonest<br>------------------------------------------------------------------------------------------ |

**स्वाध्याय:**

**१.** सिंहाने काय केले?

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**२.** चित्रे कोणी काढली?

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**३.** कवितेत आलेल्या ५ प्राण्यांची नावे लिहा.

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**उपयुक्त सूचना:**

- या कवितेचा वापर करून इतर प्राण्यांची नावे शिकवावीत.
- कवितेतील उदाहरणांचा उपयोग करून ‘यमकांची’ (rhyming) ची ओळख करून द्यावी. उदा. शाळा-फळा, ताठ-पाठ
- शब्द एक अर्थ अनेक

  “पाठ” शब्दाचा कवितेतील अर्थ आणि दुसरा अर्थ विचारावा. दोन अर्थ असलेले अजून काही शब्द सांगावेत, उदा. मान (neck, honor), चिकट (sticky, frugal), कळ (button, pain)



© BMM Marathi Shala eBook Team

# ६. देवाजीचे रूप

देवाजीचे रूप मनी आठवून
करूया वंदन भक्तिभावे

देवाजीच्या पाशी मागूया मागणे
चांगले वागणे अंगी यावे

सद्‍गुण संपन्न करी बलवान
विद्‍या हेची धन आम्हा द्‍यावे

देवाला सांगू बालके लहान
होतील महान ऐसे व्हावे

कवी - आशा गवाणकर



~~~~~



© BMM Marathi Shala eBook Team
~~~~~

**वाक्यात उपयोग करा**:

| |
|---|
| वंदन: नमस्कार<br>---------------------------------------------------------------------------------------------- |
| मागणे: हवी असलेली गोष्ट<br>---------------------------------------------------------------------------------------------- |
| बलवान: शक्तिमान (strong)<br>---------------------------------------------------------------------------------------------- |
| धन: पैसे<br>--------------------------------------------------------------------------------------------- |
| महान: थोर, श्रेष्ठ (great)<br>---------------------------------------------------------------------------------------------- |



© BMM Marathi Shala eBook Team

**शिक्षकांसाठी :**

**समाविष्ट अभ्यासक्रम:** प्रार्थना

**उपयुक्त सूचना:**

- प्रार्थना नीट चालीत म्हणायला शिकवावी.
- मुलांना कोणते देव माहित आहेत ते विचारावे.
- मुले देवळात गेल्यावर काय करतात ते विचारावे.



© BMM Marathi Shala eBook Team

# ७. अशी करा कवायत



ताठ उभे रहा. दोन पायात अंतर ठेवा.

उजवा हात वर करा. डावा हात वर करा. वर बघा.


आता टाचा उचला. तोल सांभाळता येतो आहे का?

हात आणि टाचा खाली करा. समोर बघा.



हात कमरेवर ठेवा. पुढे वाका. हातांनी पायाचे अंगठे धरा.

हळू हळू परत ताठ उभे रहा.



हात बाजूला आणि वर करत एक उडी मारा.

अजून एक अशीच उडी मारा.

अजून एक. अजून एक.

आता पुरे.



मांडी घालून खाली बसा. ताठ बसा. पोक काढून बसू नका.

पुढे वाका. कपाळ जमिनीला लागते आहे का?

वर बघा. खाली बघा. डावीकडे बघा. उजवीकडे बघा. आता समोर बघा.

डोळे मिटा आणि हात जोडा. एक ते दहा अंक मोजा. पण मनात! डोळे उघडा.

आता थोडेसे हसा !



~~~~~



© BMM Marathi Shala eBook Team
~~~~~

**वाक्यात उपयोग करा:**

| |
|---|
| ताठ: न वाकता<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| अंतर: distance<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| तोल सांभाळणे: to balance<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| टाचा: heels<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| पोक काढून: पाठीत वाकून<br>------------------------------------------------------------------------------------------ |



© BMM Marathi Shala eBook Team

**स्वाध्याय:**

**१.** या लेखात शरीराच्या कोणकोणत्या अवयवांचा उल्लेख केला आहे? (५ लिहा)

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

**२.** किती वेळा उडी मारायची आहे?

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

**३.** खाली बसून काय करायचे आहे ते लिहा.

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

**४.** लेखात आलेली कोणतीही पाच क्रियापदे (action verbs) लिहा.

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

**५.** खाली दिलेल्या ओळी बदलून लिहा: जसे: ताठ उभे रहा. □ मी ताठ उभा राहतो.



© BMM Marathi Shala eBook Team

क) दोन पायात अंतर ठेवा. ------------------------------------------------------------

ख) उजवा हात वर करा. ----------------------------------------------------------------

ग) डावा हात वर करा. -----------------------------------------------------------------

घ) वर बघा. --------------------------------------------------------------------------

**६.** खालील शब्दांचे अनेकवचन लिहा **उदा.** (एकवचन) एक डोळा - (अनेकवचन) दोन डोळे

पाय ------------------ टाच ------------------

उडी ------------------ हात ------------------

अंगठा ------------------ मांडी ------------------

**७.** दोन अक्षरे असलेली अवयवांची नावे लिहा. (कोणतेही ४)

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**८.** तीन अक्षरे असलेली अवयवांची नावे लिहा. (कोणतेही ४)

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team


**उपयुक्त सूचना:**

- पाठातील सर्व कृती मुलांकडून करून घ्याव्या.
- सूर्यनमस्कार, योगासने यांची ओळख करून द्यावी.




© BMM Marathi Shala eBook Team


# ८. चम चम चमचमतंय





चम चम चमचमतंय
गड गड गडगडतंय
टप टप टपटपतंय
सर सर सरसरतंय
झर झर झरझरतंय
पळ पळ पळतंय
खळ खळ खळखळतंय
धब धब धबधबतंय





चम चम चमकतात त्या आकाशातल्या विजा.
गड गड गडगडाट करतात ते ढग.
टप टप पडतो तो पाऊस.
सर सर कोसळतात त्या पावसाच्या सरी.
झर झर डोंगरातून वाहतो तो झरा किंवा ओढा. त्याला निर्झर असेही म्हणतात.
पळ पळ पळत वाहते ते पाणी. नदीचे पाणी.
खळ खळ खळखळाट आवाज करणारे सुध्दा पाणीच.
आणि धब धब आवाज करत उंचावरून खाली पडतो तो धबधबा.





© BMM Marathi Shala eBook Team

**वाक्यात उपयोग करा:**

| |
|---|
| गडगडाट: ढगांचा आवाज<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| सरी: पावसाच्या धारा<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| खळखळाट: खळखळ असा आवाज<br>------------------------------------------------------------------------------------------- |

**स्वाध्याय:**

**१. गाळलेल्या जागा भरा**: उदा. आकाशातल्या विजा चमकतात.

**क)** आकाशात ढग ----------------------------------------

**ख)** पावसाच्या सरी ----------------------------------------.

**ग)** डोंगरात -------------- वाहतो.

**घ)** उंचावरून पडणा-या पाण्याला ----------- म्हणतात.

**२.** गडगड, खळखळ, चमचम असे आणखी चार शब्द लिहा. उदा: बडबड

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**३.** रिकाम्या जागी तो, ती, ते यापैकी योग्य शब्द वापरा.

------ धबधबा ------ सर ------ पाऊस ------ वीज ------ डोंगर

**शिक्षकांसाठी-**

**समाविष्ट अभ्यासक्रम:** पाणी, लिंग, सर्वनाम

**उपयुक्त सूचना:**

या विषयी चर्चा करावी.

- आकाशात ढग कसे तयार होतात?
- विजा का चमकतात?
- पाऊस कसा पडतो?



© BMM Marathi Shala eBook Team

# ९. वारा



वारा येतो, वारा जातो पण तो मला दिसत नाही.
कधी वारा हळूच येतो.
हळूच वारा आला की झाडाची पाने हलतात.
हळूच वारा आला की उंच गवत हलते.
हळूच वारा आला की वाळत टाकलेले कपडे हलतात.
हळूच वारा आला की छान गार वाटते.
ती तर झुळूक !



कधी कधी वारा खूप जोरात येतो.
जोरात वारा आला की झाडे हलतात. कधी पडतात.
जोरात वारा आला की कधी कधी घराचे छप्पर उडून जाते.
जोरात वारा आला की समुद्रात उंच लाटा येतात.
हेच ते वादळ !








तोंडाने वारा घातला की मेणबत्ती विझते.
तोंडाने वारा घातला की गरम सूप गार होते.
तोंडाने वारा घातला की बासरी वाजते.
ही तर फुंकर !






वाऱ्यामुळे पतंग उडतो.
वाऱ्यामुळे झेंडा फडकतो.
वाऱ्यामुळे पवनचक्की फिरते.
वाऱ्यामुळे ढग इकडून तिकडे जातात.



© BMM Marathi Shala eBook Team

वारा दिसत नाही, पण केवढे <u>उपद्व्याप</u> करून ठेवतो!
पण जेव्हा वारा थांबतो तेव्हा उकाड्याने जीव <u>हैराण</u> होतो.
पंख्याशिवाय चालत नाही.
एसी शिवाय चालत नाही.



म्हणूनच वारा नसला तर <u>त्रास</u> होतो. आणि जास्त असला तरी त्रास होतो.
असा हा वारा.

~~~~~

**वाक्यात उपयोग करा**

| |
|---|
| पवनचक्की: windmill<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| झेंडा: flag<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| छप्पर: roof<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| फुंकर: blow<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| मेणबत्ती: candlestick<br>------------------------------------------------------------------------------------------- |



© BMM Marathi Shala eBook Team
~~~~~

झुळूक: breeze

-----------------------------------------------------------------------------------------------

**स्वाध्याय:**

**१.** जोरात वारा आला की काय काय होते? (२ गोष्टी लिहा)

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

**२.** वारा वापरून काय काय करता येते? (२ गोष्टी लिहा)

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

**३.** वारा हळूच आला की काय होते? (२ गोष्टी लिहा)

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

**४.** खालील शब्द वापरून प्रत्येकी एकेक वाक्य लिहा.

विझते -----------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

हलतात ---------------------------------------------------------------------------------------

पडतो

-------------------------------------------------------------------------------------

दिसते

-------------------------------------------------------------------------------------

उडतो

-------------------------------------------------------------------------------------

**५.** चुकीचे वाक्य दुरूस्त करून सांगा. ठळक शब्द बदला.

**क)** वारा हळूच **आली** की पाने **हलतो**.

--------------------------------------------------------------------------------------------

**ख)** लाटा अंगावर **येते.**

--------------------------------------------------------------------------------------------

**ग)** घराचे छप्पर उडून **जातात.**

--------------------------------------------------------------------------------------------

**घ)** वा-यामुळे **पवनचक्क्या** फिरते.

--------------------------------------------------------------------------------------------

**च)** मेणबत्ती वा-याने **विझतो.**

--------------------------------------------------------------------------------------------

**६.)** खालील प्रत्येक शब्दाचे अनेकवचन लिहा.



© BMM Marathi Shala eBook Team

ढग ----------------- मेणबत्ती ----------------- झेंडा

---------------

पतंग ----------------- बासरी ----------------- वादळ --------------

**७.** वर, खाली, मागे, मध्ये, समोर यापैकी योग्य शब्द वापरून वाक्य परत लिहा.

**क)** झाडा _________ सावली असते.

**ख)** भांड्या_________ सूप आहे.

**ग)** छप्परा_________ मोर बसला आहे.

घरा_________ बाग आहे. **च)** बागे_________ फुले आहेत.

**८.** संधीफोड करा

बासरी -----------------------------------------------------------------

वादळ -----------------------------------------------------------------

हलतात -----------------------------------------------------------------

इकडून -----------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**उपयुक्त सूचना:**

- पाण्याच्या वेगवेगळ्या रूपांची चर्चा करावी, उदा: पाऊस.
- वाऱ्यासारखी निसर्गात जमिनीची पण वेगवेगळी रूपे आहेत. ती कोणती? उदा: डोंगर, दरी, पठार
- यातील काहींची चित्र काढायला सांगा, चित्राचे वर्णन करायला सांगा.




© BMM Marathi Shala eBook Team

# १०. गुंडू आणि चेंडू



गुंडूच्या स्वप्नात आला चेंडू
आणि म्हणाला, अरे गुंडू !
मला फुटले दोन पाय
आता तुला सोडणार नाय.
चेंडूने मारली ठोकर
गुंडू चालला वरवर.
हात पाय झाले छोटे
पोट झाले खूप मोठे.
गुंडू पोचला चंद्रापाशी
चंद्र म्हणाला जिरली खाशी.
चंद्रानी मारली ठोकर
गुंडू पडला जमिनीवर.
छातीमध्ये झाले धस
जाग आली ओम फस!





**कवी:** विंदा करंदीकर

**वाक्यात उपयोग करा:**

ठोकर: लाथ kick

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

| |
|---|
| वर वर: up and up<br>------------------------------------------------------------------------------------------<br>----------------------------------- |
| चंद्रापाशी: near the moon<br>------------------------------------------------------------------------------------------<br>----------------------------------- |

**स्वाध्याय:**

**१.** चेंडूने कोणाला ठोकर मारली?

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**२.** गुंडूचे हात पाय कसे झाले?

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**३.** चंद्र गुंडूला काय म्हणाला?

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**४. यापैकी योग्य शब्द वापरून गाळलेल्या जागा भरा:**

वरवर, ठोकर, हात पाय, जमिनीवर, पोट

क) धुळीने तुझे ----------------- माखले आहेत.

ख) तू ----------------- झोपू नकोस.

ग) खूप खाल्ल्यामुळे तुझे ----------------- दुखते आहे.

घ) आकाशात पतंग ------------------ चालला आहे.

**५. संधीफोड करा:**

ठोकर -------------------------

हातपाय -------------------------

सोडणार -------------------------

**६.** रिकाम्या जागी तो, ती, ते यापैकी योग्य शब्द वापरा.

------- धूळ ------- चंद्र

------- स्वप्न ------- जमीन

~~~~~



© BMM Marathi Shala eBook Team
~~~~~

**शिक्षकांसाठी -**

**समाविष्ट अभ्यासक्रम:** सर्वनाम, संधीफोड

**उपयुक्त सूचना:**

- चेंडूने आणि चंद्राने गुंडूला खरेच ठोकर मारली होती का? हे विचारावे.
- चेंडूने आपल्याला ठोकर मारली असे स्वप्न गुंडूला का पडले असावे? यावर चर्चा करावी.
- मुलांना कोणती स्वप्ने पडतात ते विचारून घ्यावे.
- विंदा करंदीकरांच्या आणखी काही मजेदार कविता मुलांना सांगाव्या आणि पाठ करून घ्याव्या.


~~~~~



© BMM Marathi Shala eBook Team
~~~~~

# ११. माझ्या या दारातून

माझ्या या दारातून
कोण कोण येते? कोण कोण येते?



मामा येतो आणि मामी येते
गोड गोड पेढा देऊन जाते.
काका येतो आणि काकी येते
छान छान बाहुली देऊन जाते.



माझ्या या दारातून
कोण कोण येते? कोण कोण येते?

दादा येतो आणि वहिनी येते
चणे फुटाणे देऊन जाते.
आजोबा येतात आणि आजी येते
चेंडू आणि फुगा देऊन जाते.



माझ्या या दारातून
कोण कोण येते? कोण कोण येते?



मावशी येते आणि ताई येते
केशरी आंबे देऊन जाते.

**कवयित्री**: अनुताई वाघ

~~~~~



© BMM Marathi Shala eBook Team
~~~~~

**वाक्यात उपयोग करा:**

| |
|---|
| चणे, फुटाणे: roasted chickpeas<br>------------------------------------------------------------------------------------------------ |
| बाहुली: doll<br>------------------------------------------------------------------------------------------------ |
| चेंडू: ball<br>------------------------------------------------------------------------------------------------ |
| केशरी: orange<br>------------------------------------------------------------------------------------------------ |

**स्वाध्याय:**

**१.** दादा वहिनी काय देतात?

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**२.** आजोबा, आजी काय देतात?

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**३.** वरील कवितेत नसलेली दोन नाती लिहा.

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

**४.** खालील English शब्दांना मराठी शब्द लिहा. त्यांना एकापेक्षा जास्त मराठी शब्द आहेत का? uncle, aunt, cousin

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

**५.** येणे हे क्रियापद वापरून गाळलेल्या जागा भरा-

मी ----------------------------- तू -----------------------------

त्या ----------------------------- आम्ही -----------------------------

ते -----------------------------

~~~~~

**उपयुक्त सूचना:**


- काही नाती लग्न झाल्यावर तयार होतात. अशी नाती विचारावीत.
- मामाच्या गावाला जाऊया हे गाणं पाठ करून घ्यावे.

~~~~~




© BMM Marathi Shala eBook Team

# १२. हरवले आणि सापडले




एकदा आई कामासाठी बाहेर गेली.
निशांत आणि साकेत घरी राहिले.
निशांत खेळत बसला.
साकेत वाचत बसला.
मग दोघांना कंटाळा आला.
दोघांनी सायकल काढली.
दोघे बाहेर पडले.
सायकल चालवता चालवता दूर गेले.
मग घरी कसे यायचे कळेना.



इकडे आई घरी आली.
बघते तर दार उघडे.
मुले घरात नाहीत.
आई घाबरली आणि रडायला लागली.
मग बाबा आले.
ते विचारायला लागले.
दोघे घराबाहेर पडले.




निशांतला आणि साकेतला शोधायला लागले.
तिकडून साकेत आणि निशांत येताना दिसले.
बाबा चिडले आणि आई हसायला लागली.

- वसुंधरा पर्वते

~~~~~



© BMM Marathi Shala eBook Team
~~~~~

**नवीन शब्द (वाक्यात उपयोग करा)**

| |
|---|
| कंटाळा: boring<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| तिकडे: there<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| शोधणे: to search<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| हरवले: lost<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| सापडले: found<br>------------------------------------------------------------------------------------------ |

**स्वाध्याय:**

**१.** आई का बाहेर गेली?

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**२.** आई बाहेर गेल्यावर निशांत आणि साकेत काय करू लागले?



© BMM Marathi Shala eBook Team

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**३.** दोघे कसे बाहेर गेले? (एक उत्तर निवडा)

**क)** पळत बाहेर गेले. **ख)** चालत बाहेर गेले. **ग)** सायकलवरून बाहेर गेले.

**४.** ठळक शब्दातील चुका सुधारून वाक्य परत लिहा.

**क)** आई **घाबरला.**

------------------------------------------------------------------------------------------

**ख)** निशांत खेळत **बसली.**

------------------------------------------------------------------------------------------

**ग)** आई घरी **आले.**

------------------------------------------------------------------------------------------

**घ)** दोघे बाहेर **पडला.**

------------------------------------------------------------------------------------------

**च)** मला कंटाळा **आली.**

------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**५. कंसात लिहिल्याप्रमाणे बदल करून वाक्य परत लिहा.**

**क)** मुलगा घरी आला. ( ‘मुलगा ऐवजी ‘मुलगी’ वापरा)

------------------------------------------------------------------------------------------

**ख)** दोघे रडू लागले. ( ‘दोघे’ ऐवजी ‘दोघी ‘वापरा)

------------------------------------------------------------------------------------------

**ग)** तो खेळत बसला. ( ‘तो’ ऐवजी ‘ती’ वापरा )

------------------------------------------------------------------------------------------

**घ)** निशांत खाली पडला. (‘निशांत’ ऐवजी ‘आशा ‘वापरा.)

------------------------------------------------------------------------------------------

**६.** घाबरली, रडतो, खेळतात, फिरायला हे शब्द वापरून एकेक वाक्य लिहा.

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**७.** खालील वाक्यातील ठळक शब्दाचे अनेकवचन करून वाक्य परत लिहा.

**क) मुलगी** घरी आली.

------------------------------------------------------------------------------------------

**ख) घर** मोठे होते.

------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**ग) सायकल** मोठी होती.

-----------------------------------------------------------------------------------------------

**घ)** रस्त्यात **माणूस** होता.

-----------------------------------------------------------------------------------------------

~~~~~



© BMM Marathi Shala eBook Team
~~~~~

**समाविष्ट अभ्यासक्रम:** वचन

उदा. एकवचन - (एक) फुगा अनेकवचन - (खूप) फुगे

**उपयुक्त सूचना:**

- आई का रडायला लागली? बाबा का चिडले? हे मुलांना विचारावे.
- घरातील एक महत्वाचा कागद हरवला आणि सगळेजण कागद शोधायला लागले यावर मुलांचा एक संवाद बसवावा.
- स्त्रीलिंगी आणि पुल्लिंगी अशा प्रत्येकी ५ शब्दांची ओळख करून द्यावी,
- ५ एकवचनी शब्दांची अनेकवचने सांगावी.

~~~~~



© BMM Marathi Shala eBook Team
~~~~~

# १३. स्वप्नातला प्राणी

काल माझ्या स्वप्नामध्ये आला एक प्राणी
सांगा त्याचं नाव जर पाहिला असेल कोणी

वाघोबाचे डोळे, त्यावर हत्तीसारखे कान
सशासारखं अंग मऊ, जिराफाची मान

बोक्याच्या मिशा, त्यावर वांदरोबाचं नाक
सुसरीएवढा लांब आणि उंटासारखा बाक

खरोखरंच असा कोणी दिसला तर धमाल
मग म्हणाल, आहेस खरा डोकेबाज कमाल

**कवी:** वसंत बापट

**वाक्यात उपयोग करा:**

| |
|---|
| बाक: वाकडेपणा<br>------------------------------------------------------------------------------------------------ |
| धमाल: मजा (fun)<br>------------------------------------------------------------------------------------------------ |
| डोकेबाज: हुशार<br>------------------------------------------------------------------------------------------------ |



© BMM Marathi Shala eBook Team

**स्वाध्याय:**

**१.** या कवितेत आलेल्या चार प्राण्यांची नावे लिहा:

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

**२.** गाळलेल्या जागा भरा.

**क)** सशाचे अंग ------------- असते. **ख)** जिराफाची मान-----------असते.

**ग**) हत्तीचे कान -------------असतात.

**३.** वांदरोबा आणि बोकोबा म्हणजे कोण?

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

**४.** जोड्या लावा.

| | |
|---|---|
| वाघोबा | नाक |
| बोकोबा | डोळे |
| वांदरोबा | मान |
| ससा | मिशा |
| हत्ती | मऊ |
| जिराफ | कान |



© BMM Marathi Shala eBook Team

**समाविष्ट अभ्यासक्रम:** कविता

नवीन तुम्हाला सुचेल ती कविता लिहा

**उपयुक्त सूचना:**

- काल्पनिक प्राण्याचे चित्र काढा



© BMM Marathi Shala eBook Team

- या काल्पनिक प्राण्यासारखे एखादे काल्पनिक घर असेल तर ते कसे असेल ते लिहा.

- मुलांना स्वप्ने कोणती पडतात ह्याची चर्चा करा.

- डोकेबाज कुणाला म्हणावे? ह्याची चर्चा करा.



© BMM Marathi Shala eBook Team

- या प्राण्याला नाव काय द्यावं?

________________________________________

- मुलांना वसंत बापटांच्या आणखी दोन तीन कविता सांगाव्यात.


© BMM Marathi Shala eBook Team

# १४. कपिला आणि जेनी



माझे वडील शेतकरी आहेत. शेतात मका लावला आहे. सफरचंदाची बाग पण आहे. चाळीस तरी झाडे असतील. शेतावर गाईचा गोठा आहे.

गाईला दोन शिंगे आणि चार पाय असतात. पायांना खूर असतात. एक शेपटी असते. पाठीवर माशी किंवा पक्षी बसला की गाय शेपटी हलवून हलवून उडवून देते. गाय चारा खाते. गवत खाते. चारा खावून नंतर रवंथ करते. चारा खाताना गाईची मान हलली की तिच्या मानेला बांधलेली घंटी छान वाजते.





मला दोन गाई खूप आवडतात. मी एका गाईचे नाव कपिला ठेवले आहे. कपिलेचा रंग सफेद आहे. तिची शिंगे लांब आहेत. ती जरा रागीट आहे. ती मला जवळ येऊ देते, पण नवीन माणसाला लांब ठेवते. अजिबात हात लावू देत नाही.

दुसरी गाय जेनी नावाची आहे. तिला अंगभर खूप काळे पांढरे ठिपके आहेत. तिची शिंगे आखूड आहेत. ती फारच गरीब आहे.



जेनीला एक वासरू झाले आहे. वासरू फारच गोड आहे. वासरू खूप पळते. वासराला खेळताना फार मजा येते.

गाई भरपूर दूध देतात. माझा बाबा आणि काका ते दूध बाजारात विकतात. दूध गरम करून गार झाले की दुधावर जाड साय येते. मग मला माझी आजी साय



© BMM Marathi Shala eBook Team

आणि साखर खायला देते. दुधापासून दही, ताक, लोणी, तूप, पनीर तयार करतात. दूध आटवून खवा करतात. खवा वापरून पेढे करतात. मला पेढे फार आवडतात. मी एका वेळी चार तरी पेढे खातो.
अशा या आमच्या कपिला आणि जेनी.

**वाक्यात उपयोग करा:**

| |
|---|
| शेतकरी: farmer<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| मका: corn<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| सफरचंद: apple<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| गोठा: गाईचे घर<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| खूर: hooves<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| रवंथ: chew over and over<br>------------------------------------------------------------------------------------------ |



© BMM Marathi Shala eBook Team

| |
|---|
| |
| तपकिरी: brown<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| शिंगे: horns<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| रागीट: पटकन रागावणारा<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| अजिबात: at all<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| आखूड: छोटा<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| वासरू: गाईचे पिल्लू calf<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| साय: cream<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| आटवून: reduce (water content in milk) by heating |



© BMM Marathi Shala eBook Team

---------------------------------------------------------------------------------------------------

**स्वाध्याय:**

**१.** शेतात काय लावले आहे?

---------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

**२.** गाईचे दोन अवयव लिहा.

---------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

**३.** गाईची मान हलली की कसला आवाज येतो?

---------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

**४.** जेनी कशी दिसते? कपिला कशी दिसते?

---------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**५.** दुधापासून काय काय करतात?

-----------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

**६.** मासा, कावळा, कुत्रा, हत्ती, मांजर, घोडा यांचे अवयव लिहा.

-----------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------

**७.** खालील प्रत्येक शब्दाचे अनेकवचन लिहा.

वासरू ----------------------- सफरचंद -----------------------

गवत ------------------------ गाय -----------------------

शेपटी ------------------------ बाग -----------------------

पेढा ------------------------

**८.** खालील वाक्यातील चुका ओळखून त्या दुरूस्त करा.

**क)** गाय **गोठा** असते. ----------------------------------------------------------------

**ख)** गाय दूध **देतो**. --------------------------------------------------------------------

**ग) माझा** वडील शेतकरी **आहे.** ----------------------------------------------------------

**घ)** मला दूध **आवडतो**. ----------------------------------------------------------------

**च) गाईची** रंग पांढरा आहे.---------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**समाविष्ट अभ्यासक्रम:**

**आपण काय शिकलो:** जोडाक्षरविरहित वाचन, क्रियापद, वचन, लिंग

**प्रश्न:**

गाई खेरीज आणखी कोणाचे दूध वापरले जाते?

______________________________________________________

_______________________

दुधात असणारे उपयुक्त अन्नघटक कोणते?

______________________________________________________

_______________________

तुम्हाला दूध कोठे मिळते? ते कोठून येते? या सर्वांची चर्चा करावी.

______________________________________________________

_______________________

______________________________________________________

_______________________



© BMM Marathi Shala eBook Team

जेनी आणि जेनीचे वासरू यांचे चित्र काढा.



© BMM Marathi Shala eBook Team





# १५. चवी

नको ग रडू कारले <u>कडू</u>
<u>खारट</u> मीठ आला <u>वीट</u>.

गोड आंबा आताच कापा
आमरस पुरीचा <u>बेत</u> <u>आखा</u>.

<u>आंबट</u> कैरी लोणच्यात <u>मुरली</u>
<u>तिखट</u> मिरची <u>ठेच्यात</u> शिरली.





तोंडात चघळा <u>तुरट</u> आवळा
अपचनाचा संभव टाळा.

सहा चवींच्या सहा <u>त-हा</u>
प्रत्येकीचा <u>रुबाब</u> निराळा.

दररोज चाखून सा-या चवी
<u>निरोगी</u> राहण्याची मिळते <u>हमी</u>.
~~~~~

**वाक्यात उपयोग करा:**

| |
|---|
| कारले: bitter gourd<br>------------------------------------------------------------------------------------------------ |
| कडू: bitter<br>------------------------------------------------------------------------------------------------ |



© BMM Marathi Shala eBook Team
~~~~~

| |
|---|
| खारट: मिठाच्या चवीचे<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| वीट आला: got fed up<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| बेत आखा: plan<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| अपचन: पोट बिघडणे<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| संभव: possibility<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| रुबाब: ऐट<br>------------------------------------------------------------------------------------------- |

~~~~~

**स्वाध्याय:**

**१.** या कवितेत कोणत्या चवी आल्या आहेत? त्या आणि त्यांचे पदार्थ लिहा.

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team
~~~~~

---

**२.** गोड, आंबट चवींचे अजून दोन दोन पदार्थ लिहा.

**गोड** ---

---

**आंबट** ---

---

**३.** या कवितेत कोणती क्रियापदे (verbs) आली आहेत?

---

---

---

---

**४.** या कवितेत जिथे यमक (rhyming words) आहे, ते शब्द लिहा. उदा. रडू कडू

---

---

---

---

---

**५.** तुम्हाला कोणती चव सगळ्यात आवडते? त्या चवीचे दोन पदार्थ लिहा.

---

---

---



© BMM Marathi Shala eBook Team

**६.** गाळलेल्या जागी या क्रियापदांची योग्य रूपे लिहा - कापणे, शिरणे, रडणे, चाखणे

**क)** सुरीने माझे बोट ______________

**ख)** ते मांजर दरवाजातून आत ______________

**ग)** ते बाळ ______________ होते. **घ)** मी आंबा ______________

**७.** चुकीची दुरूस्ती करून परत लिहा..

ती आंबा ______________ तो कारले ______________

ते पुरी ______________ ती लोणचे ______________

~~~~~

**समाविष्ट अभ्यासक्रम:**

**आपण काय शिकलो:** चवी, क्रियापद, लिंग

**प्रश्न:**

एखाद्या गोष्टीला चवच नसेल तर ती कशी लागेल? या वर चर्चा करा आणि लिहा:

________________________________________________________________

______________________________

________________________________________________________________

______________________________



© BMM Marathi Shala eBook Team
~~~~~

सहा चवी कोणत्या आणि त्यांचे महत्व सांगा?


“मीठ नसेल तर“ या विषयावर चर्चा करा आणि लिहा:


© BMM Marathi Shala eBook Team

# १६. कागद



मला कागदांशी खेळायला आवडते. मी कात्रीने कागद कापून छान छान वस्तू बनवते. मी कागदाची होडी करते, घडी घालून टोपी करते, कागदाचा पतंग करते, रंगीबेरंगी फुले करते.




कधी कधी आई आणि मी रंगीत कागदांचा कंदील करतो. दिवाळीत तो वरती लावतो. त्यात दिवा लावतो. त्याचा रंगीत प्रकाश पडतो. असा कंदील खूप छान दिसतो.



कागद कापताना लहान लहान तुकडे पडतात. ते तुकडे मी हवेत उडवते. मग सगळे तुकडे घरभर पसरतात. मला खूप मजा वाटते. पण आई म्हणते, "किती कचरा केलास?" मग मी सगळे तुकडे उचलते.

कागदावर चित्रे काढायला मला फार आवडतात. या चित्रांची मी एक वही केली आहे. कागदावर मी अक्षरे आणि आकडे लिहिते. चांगले अक्षर काढले की आई-बाबा मला शाबासकी देतात.



- वसुंधरा पर्वते

~~~~~



© BMM Marathi Shala eBook Team
~~~~~

**वाक्यात उपयोग करा**:

| |
|---|
| घडी: fold<br>-----------------------------------------------------------------------------------------------<br>---------------- |
| रंगीबेरंगी: अनेक रंगाचा (colorful)<br>-----------------------------------------------------------------------------------------------<br>---------------- |
| प्रकाश: उजेड (light)<br>-----------------------------------------------------------------------------------------------<br>---------------- |
| कंदील: lantern<br>-----------------------------------------------------------------------------------------------<br>---------------- |
| हवेत: in the air<br>-----------------------------------------------------------------------------------------------<br>---------------- |
| तुकडे: pieces |



© BMM Marathi Shala eBook Team

| |
|---|
| ------------------------------------------------------------------------------------------ ---------------- |
| कचरा: trash<br>------------------------------------------------------------------------------------------ ---------------- |
| शाबासकी: compliments<br>------------------------------------------------------------------------------------------ ---------------- |

**स्वाध्याय:**

**१. गाळलेले शब्द भरा.**

**क)** मी कागदाची घडी घालून ________________ करते.

**ख)** मी कागदाची ________________ फुले करते.

**ग)** कंदिलाचा ________________ प्रकाश पडतो.

**घ)** कागदाचे लहान लहान ________________ पडतात.

**च)** कागदावर मी ________________ आणि ________________ लिहिते.

**२. अनेकवचन करा.**

| | |
|---|---|
| कागद ________________ | फूल ________________ |
| दिवा ________________ | घडी ________________ |
| अक्षर ________________ | आकडा ________________ |



© BMM Marathi Shala eBook Team

**३. एक मुलगा ही वाक्ये कशी सांगेल ते लिहा.**

**क)** ते तुकडे मी हवेत उडवते.

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------

**ख)** मी कागदाचा पतंग करते.

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------

**ग)** आई आणि मी रंगीत कागदांचा कंदील करतो.

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------

**घ)** मग सगळे तुकडे घरभर पसरतात.

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------

**च)** कागदावर मी अक्षरे आणि आकडे लिहिते.

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**समाविष्ट अभ्यासक्रम:** लिंग, वचन

**प्रश्न:**

एक मुलगा ही माहिती कशी सांगेल? ते सांगा. (त्यातील दोन वाक्ये खाली लिहा.)

---

---

कागदाचे अजून उपयोग सांगा.

---

---

---

मुलांना “शाबासकी” कधी मिळते ते सांगा.

---

---

---



© BMM Marathi Shala eBook Team

# १७. सुंदरी



आमच्याकडे एक मांजर आहे. तिचा रंग पांढरा आहे. तिचे डोळे हिरवे आहेत. तिचे अंग मऊ मऊ आहे.

मी कुठेही बसले की ती म्यांव म्यांव करीत माझ्या मांडीवर येऊन बसते. मग मी तिच्या अंगावरून हात फिरवते. ते तिला फार आवडते. पण तिची शेपटी कुणी ओढली की मात्र ती रागावते. जोरात म्यांव करून पळून जाते.

मी तिचे नाव सुंदरी ठेवले आहे. तिला दूध आणि पेढे फार आवडतात. एकदा माझ्या आजीने पेढे आणले होते. त्यातले दोन तीन पेढे मी खाल्ले आणि खेळायला गेले. परत आले तर आई रागावलेली. “अग, किती पेढे खाल्लेस? पोट <u>बिघडेल</u> तुझे"
“अग आई, मी फक्त तीन पेढे खाल्ले.“ “मग <u>बॉक्स</u> <u>रिकामा</u> कसा?“
“मला काय माहित?" शेवटी कळले की ते पेढे सुंदरीने खाल्ले. मग आईने तिला खोट्या रागाने एक हळूच <u>रट्टा</u> दिला.



सुंदरी नेहमी घरात जिन्याच्या मधल्या जागेत बसते. तिथे तिची एक मऊ निळी उशी आहे. ती तिथे अंगाची <u>मुटकुळी</u> करून झोपते. पण मला वाटते ती नेहमी <u>जागीच</u> असते. कधीही तिथून गेले तरी म्यांव म्यांव करीत मागे मागे येते.

ती नेहमी आपले अंग चाटून चाटून साफ करते. त्यामुळे ती कधी मळलेली दिसत नाही. कधी कधी मी तिला उचलते. आणि <u>घट्ट</u> धरून टबमध्ये आंघोळ घालते. ते तिला मुळीच आवडत नाही. ती ओरडून <u>घर डोक्यावर घेते</u>.





© BMM Marathi Shala eBook Team

सुंदरीला बागेतले ससे फार घाबरतात. ती बाहेर गेली रे गेली की ते उड्या मारीत पळत सुटतात. आमच्या शेजारी एक कुत्रा आहे. त्याचे नाव बंब्या. बंब्या सुंदरीच्या अंगावर धावून आला की सुंदरी घाबरते आणि घरात येऊन बसते.



एकदा सुंदरीला तीन <u>पिल्ले</u> झाली. ती कापसासारखी मऊ मऊ होती. सुंदरी पिल्लाजवळ बघायची. कुणी जवळ आले तर ओरडायची. ती पिल्ले हळूहळू मोठी झाली. घरात <u>हिंडायला</u> लागली. माझ्याबरोबर खेळायला लागली. मला फार गंमत वाटली.

अशी ही आमची सुंदरी! तुम्हाला आवडली का?

**- वसुंधरा पर्वते**

**वाक्यात उपयोग करा:**

| |
|---|
| पोट बिघडेल: पोटात दुखेल<br>---------------------------------------------------------------------------------------------------- |
| मळलेली: धूळ लागलेली<br>---------------------------------------------------------------------------------------------------- |
| रट्टे: फटके<br>---------------------------------------------------------------------------------------------------- |
| अंगाची मुटकुळी करून: हातपाय जवळ घेऊन<br>---------------------------------------------------------------------------------------------------- |



© BMM Marathi Shala eBook Team

| |
|---|
| हिंडायला: फिरायला<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| कापसासारखी: कापूस (cotton like)<br>------------------------------------------------------------------------------------------ |

**स्वाध्याय:**

**१.** सुंदरी केव्हा रागावते?

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**२.** सुंदरीला खायला काय आवडते?

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**३.** सुंदरीची पिल्ले कशी होती?

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**४.** सुंदरी कोणाला घाबरते? ती घाबरली की काय करते?

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

**५.** सुंदरीला कोण घाबरते?

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

**६. ठळक शब्दांचे एकवचन करून वाक्ये परत लिहा.**

क) सुंदरीला **ससे** घाबरतात.

-----------------------------------------------------------------------------------------

ख) मी **पेढे** खातो.

-----------------------------------------------------------------------------------------

ग) **पिल्ले** मोठी झाली.

-----------------------------------------------------------------------------------------

**७. हा, ही, हे वापरून गाळलेल्या जागा भरा.**

_________ ससा _________ उशी

_________ शेपटी _________ अंग



© BMM Marathi Shala eBook Team

८. तुमच्याकडे कुत्रा आहे असे समजून त्याबद्दल पाच वाक्ये लिहा.

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

---------------

**९. सर्वनामे आणि विशेषनामे वेगळी करा:** ती, सुंदरी, तुम्ही, तू, बंब्या

**सर्वनामे:** ------------------------------------------------

**विशेषनामे:** ------------------------------------------------

**समाविष्ट अभ्यासक्रम:**

**आपण काय शिकलो:** लिंग, वचन, सर्वनाम, विशेषनाम

**प्रश्न:**

आणखी चार सर्वनामे आणि चार विशेषनामे सांगून त्यांचा वाक्यात उपयोग करा।

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

घर डोक्यावर घेणे म्हणजे काय? ते स्पष्ट करून असेच आणखी चार वाक्प्रचार सांगा आणि त्यांचा वाक्यात उपयोग कर।

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

पाळीव प्राणी कोणते? त्यांच्याबद्दल माहिती लिहा.

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------




© BMM Marathi Shala eBook Team

## १८. अश्शी सुट्टी सुरेख बाई



अश्शी सुट्टी सुरेख बाई
हिरवळ दाटे चोहिकडे
वह्या-पुस्तके, दप्तर-बिप्तर
नाही आठवत कुठे पडे





अश्शी सुट्टी सुरेख बाई
सूर्यच उशिराने उठतो
डोळे उघडून बघते मी तर
“चल गप्पा मारू” म्हणतो.



अश्शी सुट्टी सुरेख बाई
चंगळ होते खाण्याची
सुस्ती येता सहजच होते
टंगळ-मंगळ कामाची



अश्शी सुट्टी सुरेख बाई
हवेत ये गंमतजंमत
किती खेळले तरी आपले
हात-पाय नाही दमत-थकत
अश्शी सुट्टी सुरेख बाई
पंख फडफडत उडून जाते
माझ्यापाशी आठवणींची
रंगीबेरंगी पिसे ठेवते.

**कवी** - अनंत भावे



© BMM Marathi Shala eBook Team

**वाक्यात उपयोग करा:**

| |
|---|
| हिरवळ: greenery<br>------------------------------------------------------------------------------------------------ |
| सुरेख: छान<br>------------------------------------------------------------------------------------------------ |
| दप्तर: शाळेत न्यायची पिशवी (school bag, backpack)<br>------------------------------------------------------------------------------------------------ |
| उशिराने: late<br>------------------------------------------------------------------------------------------------ |
| चंगळ: हवे ते खायला मिळते<br>------------------------------------------------------------------------------------------------ |
| सुस्ती : झोप, पेंग (dozing)<br>------------------------------------------------------------------------------------------------ |
| टंगळ-मंगळ: टाळाटाळ (avoid)<br>------------------------------------------------------------------------------------------------ |
| पंख फडफडत: wings fluttering |



© BMM Marathi Shala eBook Team

-----------------------------------------------------------------------------------------------

**स्वाध्याय:**

**१.** "अशी सुट्टी सुरेख बाई" असे कवितेतील मुलीला का वाटते?

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

२. सुट्टीमध्ये कामाची टंगळ-मंगळ का होते?

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

**समाविष्ट अभ्यासक्रम:**

**आपण काय शिकलो:** जोडशब्द जसे गंमत-जंमत, टंगळ-मंगळ

(कधी कधी भाषेत दोन शब्द जोडून येतात, त्या शब्दांना जोडशब्द असे म्हणतात. जसे अवतीभवती, शेजारपाजार)

**प्रश्न:** मुलांच्या सुट्टीतले अनुभव (चांगले, वाईट) लिहा.

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

“दप्तर-बिप्तर” , “टंगळ-मंगळ” असे अजून जोडशब्द लिहा.

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

सूर्यच उशीराने उठतो, चल गप्पा मारू म्हणतो, हवेत ये गंमतजंमत, सुट्टी पंख फडफडत उडून जाते, आठवणींची पिसे ठेवते या अलंकारिक भाषेची गंमत समजून घ्या.

~~~~~



© BMM Marathi Shala eBook Team
~~~~~

# १९. माझी शाळा



माझी शाळा घराजवळ आहे. मी माझ्या आईबरोबर चालत शाळेत जातो. माझी आई मला रोज डबा देते. डब्यात पोळी-भाजी असते. माझ्या वर्गात पंचवीस मुले आहेत.



माझी टीचर मला फार आवडते. ती लिहायला, वाचायला शिकवते. ती गोष्टी सांगते, गाणीही म्हणते. ती अजिबात रागवत नाही. कधी कधी आम्ही नाटकही करतो. तेव्हा खूप मजा येते. मला वाचायला खूप आवडते. मी चांगले वाचले की ती मला शाबासकी देते.



एक दिवस एक नवा मुलगा वर्गात आला, तो रडत होता. टीचरने त्याला माझ्या शेजारी बसवले. मी त्याच्याशी गप्पा मारल्या. मग तो हसू लागला.

माझी टीचर फळ्यावर खडूने लिहिते, तिचे अक्षर चांगले आहे. मी तिच्यासारखे अक्षर काढतो. तिचा गणिताचा तासही मजेचा असतो. ती न रागावता गणित समजावून देते.

शाळेतील कवितेचा तास मला फार आवडतो. आम्ही सगळी मुले कविता चालीवर म्हणतो.



© BMM Marathi Shala eBook Team

शाळा सुटली की मात्र मला घरी जाण्याची घाई असते. आई कधी भेटते असे मला होते. सुटीच्या दिवशीही मला शाळेची आठवण येते.

वसुंधरा पर्वते





© BMM Marathi Shala eBook Team

**वाक्यात उपयोग करा:**

| |
|---|
| शाबासकी देणे: compliments<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| गप्पा मारल्या: बोललो (chat)<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| समजावून देते: explain<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| आठवण येते: remember<br>------------------------------------------------------------------------------------------<br>--------------- |

~~~~~

**स्वाध्याय:**

**१.** वर्गात किती मुले आहेत?

------------------------------------------------------------------------------------------

**२.** मी (कवितेतील मुलगा) डब्यात काय नेतो?

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**३.** टीचर काय काय करते? (२ गोष्टी लिहा)

------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team
~~~~~

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------

**४.** मला घरी जाण्याची घाई का असते?

----------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------

**५.** प्रत्येक शब्दाचे अनेकवचन लिहा

पोळी ---------------------------- भाजी ----------------------------

नाटक ---------------------------- डबा ----------------------------

घर ---------------------------- कविता ----------------------------

**६.** सांगितल्याप्रमाणे योग्य तो बदल करून वाक्ये परत लिहा.

**क)** आम्ही नाटक करतो. ('आम्ही'च्या ऐवजी 'ती' वापरा.)

----------------------------------------------------------------------------------------------

**ख)** तो हसू लागला. ('तो' ऐवजी 'मी' वापरा.)

----------------------------------------------------------------------------------------------

**ग)** मुले कविता म्हणतात. ('मुले' ऐवजी 'तो' वापरा.)

----------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**७.** या धड्यातले ३ अनेकवचनी शब्द लिहा.

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

**समाविष्ट अभ्यासक्रम:**

**आपण काय शिकलो:** वचन

**प्रश्न:** तुमची कोणती/ तुमचा कोणता टीचर तुम्हाला आवडते / आवडतो? का?

___________________________________________________________

___________________________________________________________

___________________________________________________________

तुमच्या शाळेतील कोणती गोष्ट तुम्हाला खूप आवडते?

___________________________________________________________

___________________________________________________________

___________________________________________________________

तुमचा शाळेतील पहिला दिवस कसा होता?

___________________________________________________________

___________________________________________________________

___________________________________________________________



© BMM Marathi Shala eBook Team

तुम्हाला शाबासकी कधी मिळाली आहे का? त्या विषयी लिहा.

माझा आवडता तास, विषय, नावडता विषय यावर लिहा.




© BMM Marathi Shala eBook Team

## २०. मला आवडते... !



मला खेळायला आवडते. मी लपंडाव खेळतो. पकडापकडी खेळतो. चेंडूने खेळतो. खूप खूप पळतो. मग दमतो. मग घरी आल्यावर माझे पाय खूप दुखतात. मग आई मला जेवायला घालते. माझे पाय चेपते. आणि मग मी पटकन झोपून जातो.

शाळा नसली की मला उशिरा उठायला खूप आवडते. मी शनिवारी आणि रविवारी सकाळी १० वाजता उठतो. पण एका शनिवारी मी ६ वाजताच उठलो आणि गुपचूप खाली येऊन टीव्ही बघत बसलो. परत ७ वाजता वर जाऊन आई आणि बाबांबरोबर झोपलो. कोणाला काही कळलेच नाही.



मला लहान बहिणीला चिडवायला आवडते. एकदा मी तिला वेडावून दाखवले. तिने पण मला वेडावून दाखवले. मग मी खूप भयंकर चेहरा केला. वाघासारखा आवाज काढला. डोळे मोठे मोठे केले. ती एकदम घाबरली. मी हसायला लागलो. तिने जोरात भोकाड पसरले. आई पटकन आली आणि मला ओरडली. आईने तिला जवळ घेतले. मग मी तिला खूपच गमतीशीर तोंडे करून दाखवली. वेडीवाकडी पावले टाकत थोडा नाच केला. आई हसायला लागली. माझी छोटी बहीण पण रडायची थांबली आणि हसायला लागली.



मला सायकल चालवायला खूप आवडते. लहान असताना मी तीन चाकी सायकल चालवत असे. मग बाबांनी मला मोठी दोन चाकी सायकल आणली आणि मला सायकल चालवायला शिकवले. सुरवातीला तिला अजून दोन चाके होती. नंतर ती काढून टाकली. शिकताना मी खूप वेळा सायकलवरून पडलो. एकदा तर एका झाडावरच आपटलो. पण आता मला सायकल फारच छान येते. मी मोठा झाल्यावर सायकलपटू होणार आहे. मला अजून काय काय आवडते?



© BMM Marathi Shala eBook Team



मला पोहायला, वाचायला, शाळेत जायला, <u>रंगवायला</u>, देवळात जायला, घसरगुंडीवर घसरायला, आईबाबांबरोबर विमानातून जायला, खूप वेळ आंघोळ करायला आवडते. सगळे सांगत बसलो तर जागाच <u>संपून</u> <u>जाईल</u>. पण एक शेवटचे सांगतो, आईबरोबर <u>कुशीत</u> झोपताना येते तशी मजा कधीच येत नाही!

**वाक्यात उपयोग करा:**

| |
|---|
| लपंडाव: लपायचा आणि शोधायचा खेळ<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| पाय चेपणे: पाय दाबणे<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| उशीरा: late<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| गुपचूप: न बोलता<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| भयंकर: भीतीदायक<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| भोकाड पसरणे: मोठ्याने रडणे<br>------------------------------------------------------------------------------------------ |



© BMM Marathi Shala eBook Team

| |
|---|
| |
| सायकलपटू: सायकल चालवणारा<br>------------------------------------------------------------------------------------------ |

**स्वाध्याय**

**१.** लेखकाला काय काय खेळायला आवडते? (५ लिहा)

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**२.** लेखकाची बहीण का रडायला लागली? तीन कारणे सांगा.

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**३.** लेखक मोठेपणी कोण होणार आहे?

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**४.** लेखकाला अजून काय काय आवडते? (५ लिहा)

------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**५.** तुम्हाला काय काय आवडते? (५ लिहा)

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**६.** खालील प्रत्येक वाक्यातील चुकीचा शब्द ठळक अक्षरात आहे. चूक ओळखून दुरूस्त करा आणि वाक्य परत लिहा.

**क)** एक मुलगी झाडावर **आपटलो.**

------------------------------------------------------------------------------------------

**ख)** आई **मी** ओरडली.

------------------------------------------------------------------------------------------

**ग)** बाबांनी दोन **सायकल आणली.**

------------------------------------------------------------------------------------------

**७.** रडला, हसली, ओरडलो, दाखवला, पसरले, चिडवले हे शब्द वापरून एकेक वाक्य लिहा.

------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

**८.** तुम्हाला काय करायला आवडत नाही ते सांगा.

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

**समाविष्ट अभ्यासक्रम:**

**आपण काय शिकलो:** वेगवेगळी क्रियापदे

**प्रश्न :** एक मुलगी हे सगळे सांगत असती तर तिने कसे लिहिले असते?
(उदा. मी लपंडाव खेळते) अशा दहा ओळी लिहा:



© BMM Marathi Shala eBook Team

मोठेपणी मी कोण होणार याबद्दल चर्चा करा.



© BMM Marathi Shala eBook Team

## २१. पाहुणे

आमच्या घरी नेहमी पाहुणे येतात. पाहुणे आलेले मला खूप आवडतात कारण ते माझ्यासाठी खाऊ आणतात, खेळणी आणतात.



मी त्यांना गाणी आणि श्लोक म्हणून दाखवतो. मग ते मला बक्षिसही देतात.
कधी कधी त्यांच्याबरोबर लहान मुले असतात. मग तर फारच मजा येते. मी त्यांना घेऊन घरामागच्या बागेत जातो. तिथल्या पाण्यातले मासे दाखवतो. घसरगुंडीवरून घसरतो. झोपाळ्यावर झोके घेतो.
पाहुणे आले की आई जेवायला छान छान पदार्थ करते. आई, बाबा, मी, आणि सगळे पाहुणे असे सर्वजण एकत्र जेवतो. कधी कधी आम्ही बाहेर जेवायलाही जातो.
पाहुण्यांना झोपायला मी माझी खोली देतो. ते जायला निघाले की मी त्यांना वाकून नमस्कार करतो. मग ते खूष होतात.



कधी कधी पाहुणे गंमतही करतात. एकदा आमच्याकडे आईचे मामा आले होते, त्यांनी चुकून बेसिनचा नळ उघडा ठेवला, मग काय! सगळे पाणी संपून गेले.
एकदा आमच्याकडे दोन पाहुणे अचानक आले. तेव्हा रात्रीचे बारा वाजले होते. आम्ही सर्वजण झोपलो होतो. मग आई उठली. तिने पिठले आणि भात केला. पाहुण्यांना जेवायला वाढले.
एकदा माझी आई आजारी होती. तेव्हा बाबांचे मित्र आले. त्यांनी चक्क स्वयंपाक केला.
एकदा एक पाहुणा मुलगा माझ्याबरोबर खेळत होता, त्याने चेंडू फेकला. तो चेंडू टीव्हीच्या काचेवर आदळला. काच फुटली. तो रडायला लागला. मी पण रडायला लागलो. आईबाबांना पाहुणे आलेले खूप आवडतात. मला तर खूपच आवडतात. कारण सांगू? कारण पाहुणे आले की आईबाबा मला अजिबात रागावत नाहीत. म्हणूनच मी नेहमी पाहुण्यांची वाट बघत असतो.

- वसुंधरा पर्वते



© BMM Marathi Shala eBook Team

**वाक्यात उपयोग करा:**

| |
|---|
| श्लोक: छोटी प्रार्थना<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| घसरगुंडी: slide<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| एकत्र: together<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| अचानक: एकदम<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| पिठले: चणा डाळ (chickpeas) वापरून केलेला पदार्थ<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| अजिबात: at all<br>------------------------------------------------------------------------------------------- |

**स्वाध्याय:**

१. पाहुणे काय काय आणतात?

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**२.** आईच्या मामांनी काय गंमत केली?

**३.** पाहुण्या मुलाने चेंडू कुठे फेकला?

**४.** पाहुणे आलेले लेखकाला का आवडतात? (२ कारणे सांगा)

**५.** तुमच्याकडे कोण कोण पाहुणे येतात?



© BMM Marathi Shala eBook Team

---

**६.** खालील वाक्यातील ठळक शब्दाचे अनेकवचन करून वाक्ये परत सांगा.

**क)** **मुलगा** पाण्यात खेळतो.

-----------------------------------------------------------------------------------------

**ख)** मला **गाणे** आवडते.

-----------------------------------------------------------------------------------------

**७.** तो, ती, ते योग्य ठिकाणी वापरा.

------- मुलगा, -------- चेंडू , -------- -काच, -------- पाणी, ------ -झोपाळा

**८.** हे शब्द वापरून गाळलेल्या जागा भरा: रागावले, बघतो, जेवतो, घसरते, आवडतात.

**क)** मला पाहुणे ------------------

**ख)** आम्ही सगळे एकत्र ---------------

**ग)** मी टीव्ही ------------------

**घ)** बाबा मला ------------------

**च)** अलका केळ्याच्या सालीवरून ---------------



© BMM Marathi Shala eBook Team

**समाविष्ट अभ्यासक्रम:** लिंग, वचन, क्रियापद


**उपयुक्त सूचना:**

- घरी पाहुणे आले की त्रास होतो का याबद्दल मुलांशी चर्चा करावी.



© BMM Marathi Shala eBook Team


## २२. पंख मला जर असते..




<u>पंख</u> मला जर असते दोन
<u>पतंग</u> उडवीत बसेल कोण?

मीच <u>पाखरू</u> झालो असतो,
<u>आभाळावर</u> गेलो असतो
निळी <u>निळाई</u> आभाळाची,
पंखावरती <u>माखायाची</u>.





चार <u>चांदण्या</u> छोट्या छोट्या,
तोडून केल्या असत्या <u>गोट्या</u>.
<u>विमान</u> मागे पडले असते,
<u>हार</u> <u>खाउनी</u> रडले असते,



सगळे माझा करतील <u>हेवा</u>,
पंख मला पण <u>फुटतील</u> केव्हा?

~~~~~



© BMM Marathi Shala eBook Team
~~~~~

**वाक्यात उपयोग करा:**

| |
|---|
| पतंग: kite<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| पाखरू: पक्षी<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| गोट्या: marbles<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| हार खाणे: हरणे<br>------------------------------------------------------------------------------------------- |

**स्वाध्याय:**

**१.** कवीला काय हवे आहे?

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------

**२.** आभाळाचा रंग काय आहे?

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**३.** कवीला कोणाला हरवायचे आहे?

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**४.** खालील प्रत्येक शब्दाचे अनेकवचन लिहा

चांदणी --------------------- पंख -----------------------

गोटी ---------------------- पाखरु -----------------------

**५.** खालील वाक्यातील चुकीचा ठळक शब्द दुरूस्त करून वाक्य परत लिहा.

**क)** पाखरू आकाशात **उडतो.**

------------------------------------------------------------------------------------------

**ख)** आभाळ **निळा** असते.

------------------------------------------------------------------------------------------

**ग) विमान** उंच उडतात.

------------------------------------------------------------------------------------------

**समाविष्ट अभ्यासक्रम: आपण काय शिकलो:** वचन

**प्रश्न:** तुम्हाला पंख फुटले तर तुम्ही काय कराल? यावर पाच वाक्ये लिहा।



© BMM Marathi Shala eBook Team

______________________________________________________________

______________________________________________________________

आकाशात गेलात तर काय काय दिसेल? याची चर्चा करा.

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

__________________________________________________________

निळा, पिवळा, हिरवा इ. रंगांची ओळख करून घ्या. निसर्गात ह्या रंगांच्या काय काय गोष्टी आढळतात?

निळा:__________________________________________________________

______________________________________________________________

पिवळा:_________________________________________________________

______________________________________________________________

**हिरवा**:_________________________________________________________

_____________________________________________________________




© BMM Marathi Shala eBook Team

## २३. प्राण्यांचा मेळावा




एकदा रानात सर्व प्राणी,पक्षी जमले.
प्राण्यांना चार पाय आणि शेपटी असते. पक्ष्यांना पंख आणि चोच असते.
सिंह म्हणाला, “माझ्यासारखी आयाळ कोणालाच नाही. मी रुबाबदार दिसतो. मी जंगलचा राजा आहे.”






जिराफाने त्याची उंच मान आणखी उंच केली. तो म्हणाला, “मी सर्वांपेक्षा उंच.”
हत्ती पुढे आला. त्याने आपली सोंड वर उचलली. आणि त्याने ची ची असा आवाज केला.
मोराने आपला पिसारा फुलवला. तो म्हणाला,” माझ्यापेक्षा कोण सुंदर?”






कासवाने आपले हातपाय आत घेतले. ते म्हणाले,” मारा माझ्या कडक पाठीवर”.
वाघाच्या अंगावर पट्टे होते. तो रागीट दिसत होता.



गेंड्याने आपले शिंग पुढे केले. तो वाघाच्या अंगावर धावला.



तळ्यात एक बगळा होता. त्याने आपली लांब चोच दगडावर घासली.
कुत्र्याने आपली वाकडी शेपूट हलवली. मांजराने मिशा पुसल्या.
कोंबड्याचा लाल तुरा उन्हात चमकत होता.
घोडा आपल्या खुरांनी माती उकरत होता.
आपले लांब कान हलवीत ससा बिळात लपला.
फुलपाखराचे पंख नक्षीदार होते. ते मजेत उडत होते.

\- वसुंधरा पर्वते



© BMM Marathi Shala eBook Team

**वाक्यात उपयोग करा:**

| |
|---|
| मेळावा: एकत्र जमणे, get-together<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| आयाळ: mane<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| उकरणे: to dig<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| नक्षीदार: decorative<br>------------------------------------------------------------------------------------------ |

**स्वाध्याय:**

**१.** या पाठात न आलेल्या चार प्राण्यांची आणि चार पक्ष्यांची नावे लिहा.

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**२.** जोड्या लावा:

| | |
|---|---|
| पिसारा | हत्ती |
| सोंड | बगळा |
| खूर | मोर |
| चोच | घोडा |

**३.** पाठ कडक असलेल्या दोन प्राण्यांची नावे लिहा.

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

**४.** सहा पाय असलेल्या तीन कीटकांची नावे लिहा.

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

**५.** तीन पाळीव प्राण्यांची नावे लिहा.

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**समाविष्ट अभ्यासक्रम:**

**आपण काय शिकलो:** वचन, प्राणी, अवयव

**प्रश्न:** पंचतंत्रातील काही गोष्टी सांगा.

प्राण्यांच्या सभेचं वर्णन करणारे गाणे मिळवून पाठ करा.

सिंह आणि उंदीर यांची गोष्ट वाचा.

माणसाच्या सर्व अवयवांच्या मराठी नावांची ओळख करून घ्या.





© BMM Marathi Shala eBook Team

## २४. लाल कोंबडी

एका शेतावर एक छोटी लाल कोंबडी राहायची.तिला पोळी खूप आवडायची. म्हणून तिने **<u>गहू</u>** लावायचे ठरवले.

“मला गहू लावण्यासाठी कोण **<u>मदत</u>** करणार?” असे लाल कोंबडीने विचारले.


मांजर म्हणाले, “मी नाही करणार”.

ससा म्हणाला, “मी नाही करणार”. **<u>चिमणी</u>** म्हणाली, “मी नाही करणार”.

त्यावर लाल कोंबडी म्हणाली, “मग, मीच **<u>एकटी</u>** काम करते”. आणि तिने **<u>झटपट</u>** काम संपवलेसुद्धा!

**<u>हिरव्यागार</u>** पानांत **<u>सोनेरी</u> दाणे** चमकू लागले. लवकरच गव्हाचे **<u>पीक</u>** कापायची वेळ आली. “मला पीक कापण्याकरता कोण मदत करणार?” असे लाल कोंबडीने विचारले.

मांजर म्हणाले, “मी नाही करणार”.

ससा म्हणाला, “मी नाही करणार”.

चिमणी म्हणाली, “मी नाही करणार”.

त्यावर लाल कोंबडी म्हणाली, “मग, मीच एकटी काम करते”. आणि तिने झटपट काम संपवलेसुद्धा!

आता **<u>गिरणी</u>**<u>मधून</u> गहू **<u>दळून</u> पीठ** आणायला हवे होते. "माझ्याबरोबर गिरणीमधे कोण येणार?” असे लाल कोंबडीने विचारले.

मांजर म्हणाले, “मी नाही येणार”.

ससा म्हणाला, “मी नाही येणार”.

चिमणी म्हणाली, “मी नाही येणार”.

त्यावर लाल कोंबडी म्हणाली,"मग, मीच एकटी काम करते”. आणि तिने झटपट काम संपवलेसुद्धा!



© BMM Marathi Shala eBook Team

लाल कोंबडीने पीठ भिजवून **<u>कणके</u>**<u>चे</u> गोलगोल गोळे केले. “मला पोळी **लाटल्या**नंतर भाजायला कोण मदत करणार?” असे लाल कोंबडीने विचारले.
मांजर म्हणाले, “मी नाही करणार”.
ससा म्हणाला, “मी नाही करणार”.
चिमणी म्हणाली, “मी नाही करणार”.
त्यावर लाल कोंबडी म्हणाली, “मग, मीच एकटी काम करते”. आणि तिने झटपट काम संपवलेसुद्धा!
त्यानंतर एका **<u>लालचुटुक</u>** टेबलावर, तुपाच्या **<u>बरणी</u>**<u>सोबत</u>, **<u>रंगीबेरंगी</u>** बशीमध्ये गरम पोळ्या ठेवून, लाल कोंबडीने विचारले, “मला पोळी खाण्यासाठी कोण मदत करणार?”
मांजर म्हणाले, “मी करणार!”.
ससा म्हणाला, “मी करणार!”.
चिमणी म्हणाली, “मी करणार!”.
लाल कोंबडी म्हणाली, “**<u>मुळीच</u> नाही**! तुम्ही एकही काम केले नाही. कोणतीही मदत केली नाही. **<u>पेरणी</u>**<u>ला</u> नाही, **<u>कापणी</u>**<u>ला</u> नाही आणि पोळी भाजायलाही नाही. त्यामुळे मला पोळी खाण्यासाठी, तुमची थोडीसुद्धा मदत नको. आता मीच एकटी पोळ्या खाणार. आणि तिने गरमगरम पोळ्या झटपट संपवल्यासुद्धा!

**वाक्यात उपयोग करा:**

| |
|---|
| गहू: wheat<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| **हिरव्यागार**: lush green<br>------------------------------------------------------------------------------------------ |
| **पीक**: crop |



© BMM Marathi Shala eBook Team

| |
|---|
| ------------------------------------------------------------------------------------------------ |
| **लालचुटुक**: red<br>------------------------------------------------------------------------------------------------ |
| **पेरणी**: sowing<br>------------------------------------------------------------------------------------------------ |

**स्वाध्याय:**

**१.** वरील गोष्टीतल्या शब्दयोगी अव्ययांखाली रेघ ओढा. किती सापडले ते अंकात लिहा.

__________

**२.** खालील शब्द वापरून वाक्ये तयार करा.

**१)** ताईकरता २) दादापेक्षा **३)** आईशिवाय **४)** बाबांकडून **५)** त्याच्यासमोर **६)** येईपर्यंत **७)** परवापासून **८)** घरापुढे

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**३.** हिरवा: हिरव्यागार अशा अजून ३ जोड्या लिहा.

लाल ----------------------------------- काळा ----------------------------------

पांढरा ----------------------------------

**४.** गोष्टीच्या शेवटी कोंबडीने काय केले?

------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------

**५.** लाल कोंबडीच्या कामांचा (पहिले काम, दुसरे काम व तिसरे काम हे शब्द वापरून) क्रम लावा.

_______________ कोंबडीने पीठ भिजवून कणकेचे गोलगोल गोळे केले.

________________ एका लालचुटुक टेबलावर, तुपाच्या बरणीसोबत रंगीबेरंगी बशीमध्ये गरम पोळ्या ठेवल्या.

________________ गव्हाची पेरणी केली.

**६.** वरील गोष्टीतल्या कोणत्याही १० जोडाक्षरांभोवती गोल करा.

**७.** वरील गोष्टीतले ५ अनेकवचनी शब्द लिहा.

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

८. वरील गोष्टीतले ५ नपुंसकलिंगी शब्द लिहा.

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

**समाविष्ट अभ्यासक्रम:**

**आपण काय शिकलो:** शब्दयोगी अव्यय, जोडाक्षरे, वचन, क्रियापद, लेखन, संभाषण, क्रमवाचक अंक.


**उपयुक्त सूचना:**

- या गोष्टीचे नाटक करता येईल? विचार करा.
- बी पेरून त्याचे रोप बनवण्याची activity करा।



© BMM Marathi Shala eBook Team

# २५. मराठी महिने आणि सण



विजयाची गुढी चढवा चैत्रातील पाडव्याला
आणि अक्षयतृतियेला करा सुरुवात चांगल्या कामाला

वंदन करा गुरूला आषाढातील गुरुपौर्णिमेला
आणि सर्वांनी उपास करा आषाढी एकादशीला



भावाला राखी बांधा श्रावणातील नारळीपौर्णिमेला
आणि श्रावणातच दहीहंडी फोडा गोकुळाष्टमीला



भाद्रपदातील गणेशचतुर्थीला खा उकडीचे मोदक
आणि अनंतचतुर्दशीला करा गणपती विसर्जन



अश्विन शुद्ध दशमीला लुटा आपट्याचे सोने
आणि कोजागिरी पौर्णिमेला प्या मसाल्याचं दूध

कार्तिकातील बलिप्रतिपदेला साजरी करा दिवाळी
आणि भाऊबिजेला बहीण भावाला ओवाळी






पौषातल्या संक्रातीला तिळगूळ घ्या गोड बोला
आणि फाल्गुन पौर्णिमेला साजरे करा धूलिवंदन

लक्षात ठेवा हे महिने मराठी
तुमच्या आनंदाच्या सणांसाठी

\- वसुंधरा पर्वते

~~~~~



© BMM Marathi Shala eBook Team
~~~~~

**वाक्यात उपयोग करा:**

विजय: victory

-----------------------------------------------------------------------------------------

चढवा: raise

-----------------------------------------------------------------------------------------

सुरुवात: सुरू करणे

-----------------------------------------------------------------------------------------
-

गुरू: शिक्षक (teacher)

-----------------------------------------------------------------------------------------

उपास करणे: काही न खाणे (fasting)

-----------------------------------------------------------------------------------------

गणपती विसर्जन: गणपती पाण्यात बुडवणे

-----------------------------------------------------------------------------------------

लक्षात: remember

-----------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**स्वाध्याय:**

**१.** या पाठात आलेले सगळे महिने लिहा.

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

**२.** गाळलेले शब्द भरा:

**क)** गुरूला वंदन करण्याच्या दिवसाला ------------------ म्हणतात

**ख)** राखी बांधण्याच्या सणाला ------------------ म्हणतात.

हाच दिवस ------------------ म्हणून ओळखला जातो.

**ग)** गणेशचतुर्थीला ------------------ ची पूजा करतात.

**घ)** चैत्रातील पाडव्याला ------------------ म्हणतात.

**च)** धुलिवंदन म्हणजेच ------------------.

**३.** तुमचा सगळ्यात आवडता सण कोणता?

------------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**समाविष्ट अभ्यासक्रम:**

**आपण काय शिकलो:** मराठी महिने, सण

**खालील विषयी चर्चा करा.**

इतर मराठी महिन्यांची ओळख करून घ्या.

गुढी का उभारतात? होळी का साजरी करायची हे समजावून घ्या.

रक्षाबंधनाच्या दिवशी बहीण भावाला राखी का बांधते?

तुमच्याकडे गणपती आणतात का? दस-याला सोनं लुटायचं म्हणजे काय?

दिवाळीच्या चार दिवसांचं महत्व सांगावे. दिवाळी कशी साजरी केली जाते?



© BMM Marathi Shala eBook Team

## २६. निळूची करामत (नाटुकले)

**पात्रे:** लाल इंजिन, निळू इंजिन, सोनू इंजिन, काळू इंजिन
**गाडीचे डबे:** बाहुली, जोकर, खेळणे

**निवेदन:**
ही गोष्ट आहे एका झुकझुक गाडीची. बरोबर खेळणी घेऊन या गाडीचे इंजिन डोंगराच्या पलीकडे निघाले आहे. गाडीमध्ये जोकर, माकड, बाहुली अशी खेळणी आहेत. सगळ्यांना डोंगराच्या पलीकडे राहणा-या छोट्या मुलांना भेटायला जायचे आहे. पण मधेच आपल्या या गाडीचे इंजिन बिघडते. आता काय होणार? या इंजिनाला कोणी मदत करेल का? बघूया काय होते ते या नाटुकल्यामध्ये: “निळूची करामत“!

(लाल इंजिन आणि इतर डबे गाडी करून गोल गोल धावतात. दोन फे-या झाल्यावर लाल इंजिन थांबते. सगळे डबे पण थांबतात.

**बाहुली**: आपले स्टेशन कधी येणार?
**लाल इंजिन**: आधी आपल्याला या उंच डोगराच्या पलीकडे जायचे आहे. पलीकडे गावातली छोटी मुले आपली वाट बघत आहेत.
**खेळणे**: त्यांना ही सगळी खेळणी द्यायची आहेत.
**जोकर**: चला चला लवकर चला.

(अजून एक फेरी झाल्यावर लाल इंजिन परत थांबते. सगळे डबे पण थांबतात.)

**लाल इंजिन**: अग आई ग! माझा पाय खूपच दुखतो आहे. आणि मला फारच दम लागला आहे. मला नाही पुढे जाता येणार.
**जोकर**: आता आपण डोंगराच्या पलीकडे कसे जाणार?
**खेळणे**: तिकडे सगळी छोटी मुले आपली वाट बघत आहेत.


© BMM Marathi Shala eBook Team

**लाल इंजिन**: कोणी आपल्याला मदत करील का?

(मागून सोनेरी सोनू इंजिन येते.)
**लाल इंजिन**: अरे हे बघा, सोनू इंजिन आले. त्याला विचारा.
**जोकर**: तू आम्हाला डोंगराच्या पलीकडे घेऊन जाशील का?
**खेळणे**: तिकडे सगळी छोटी मुले आमची वाट बघत आहेत.

**सोनू इंजिन**: छे छे! मी नाही जाणार. मला वेळ नाही. मला मोठ्या माणसांची गाडी ओढायला जायचे आहे. मी जातो.
(सोनेरी सोनू इंजिन निघून जाते)

**लाल इंजिन**: आता काय करणार?

(मागून मोठे काळू इंजिन येते.)

**लाल इंजिन**:अरे हे बघा, काळू इंजिन आले. त्याला विचारा.

**जोकर**: तू आम्हाला डोंगराच्या पलीकडे घेऊन जाशील का?
**खेळणे**: तिकडे सगळी छोटी मुले आमची वाट बघत आहेत.

**काळू इंजिन**: छे छे! मी नाही जाणार. मी खूप ताकदवान आहे. मी असली लहान मुलांची गाडी ओढत नाही. मी जड जड डबे ओढतो. मी जातो.
(काळू इंजिन निघून जातो)

**लाल इंजिन**: आता काय करणार?

(सगळे रडायला लागतात)


© BMM Marathi Shala eBook Team

(मागून छोटे निळू इंजिन येते.)
**निळू इंजिन**: तुम्ही सगळे का रडता आहात?
**जोकर**: तू आम्हाला डोंगराच्या पलीकडे घेऊन जाशील का?
**खेळणे**: तिकडे सगळी छोटी मुले आमची वाट बघत आहेत.

**निळू इंजिन**: मी तर खूप छोटा आहे. मला एवढी मोठी गाडी कशी ओढता येणार?
(सगळे अजून मोठ्याने रडायला लागतात)

**निळू इंजिन**: <u>येईल</u> का मला? येईल का मला?
**सगळे**: हो हो येईल तुला. येईल तुला.

(निळू इंजिन गाडीच्या पुढे जाऊन हळू हळू धावायला सुरू करते.)

**निळू इंजिन**: मला वाटते येईल मला. मला वाटते येईल मला. मला वाटते येईल मला. मला वाटते येईल मला.
(हळू हळू सगळ्यांचा <u>वेग</u> वाढतो)

**सगळे**: मला वाटते येईल मला. मला वाटते येईल मला. ...

(दोन <u>फे-या</u> झाल्यावर सगळे थांबतात आणि ओरडतात)

**सगळे**: आपण आलो SSS





© BMM Marathi Shala eBook Team

**वाक्यात उपयोग करा:**

| |
|---|
| पात्रे: नाटकातली characters<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| झुकझुकगाडी: आगगाडी<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| ताकदवान: strong<br>------------------------------------------------------------------------------------------- |

**स्वाध्याय:**

**१.** या गोष्टीत कोणती पात्रे आहेत?

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------

**२.** सगळे का रडायला लागतात?

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**३.** सोनू इंजिन का मदत करत नाही?

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**४.** काळू इंजिन का मदत करत नाही?

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**५.** जोडाक्षरे असलेले नाटकातले १० शब्द लिहा.

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**६.** शब्दांची संधीफोड करा

पात्रे ----------------------------------------

येईल ----------------------------------------

डोंगराच्या ----------------------------------------

ताकदवान ----------------------------------------

**७.** योग्य शब्द वापरून गाळलेल्या जागा भरा - विचारा, ताकदवान, धावत, बघतात, आवडतात

**क)** तुम्ही त्याला --------------

**ख)** हत्ती कुत्र्यापेक्षा जास्त--------------------- आहे

**ग)** इंजिन जोरात ----------------------------होते

**घ)** मुले आईची वाट ------------------------.

**च)** लहान मुलांना खेळणी ------------------

**समाविष्ट अभ्यासक्रम:**

**आपण काय शिकलो:** संधीफोड

**प्रश्न:** नाटकात आलेली सर्वनामे सांगून इतर सर्वनामांची ओळख करून घ्या.

या गोष्टीचे तात्पर्य जाणून घ्या.

गोष्टीतल्या निळू इंजिन सारखे कधी तुमचे झाले आहे का?

नाटकातली काही वाक्ये ( ) अशी का लिहिली आहेत? या खुणांना काय म्हणतात?



© BMM Marathi Shala eBook Team

## २७. डोक्यातले गणित

खूप जुनी गोष्ट आहे. शाळेत गणिताचा तास चालू होता. शिक्षक मुलांना गणित सांगत होते. “सगळ्यांनी हे गणित लिहून घ्या. आणि न चुकता उत्तर सांगा.”
“एका कुरणातले सगळे गवत खायला ५ मेंढ्याना २८ दिवस लागतात. तर किती मेंढ्या फक्त २० दिवसात ते सगळे गवत खाऊन टाकतील?”
शिक्षकांचे गणित सांगून सांगताच, लगेचच एका मुलाचा आवाज आला.
“७ मेंढ्या”.
शिक्षक चकित झाले. त्यांना वाटले की कोणीतरी अंदाजाने आकडेमोड न करताच उत्तर दिले. ते रागावले आणि ओरडले, “कोण तो? गणित न करताच उत्तर कोणी सांगितले?” वर्गातली मुले ओरडली, “बाळ ! बाळ!”
शिक्षक तरातरा चालत बाळच्या जवळ गेले. त्यांनी त्याची वही उचलली. वहीचे पान कोरे होते. बाळने गणित लिहून सुध्दा घेतले नव्हते. शिक्षक अजूनच रागावले आणि म्हणाले, “गणित लिहून सुध्दा न घेता अंदाजाने तोंडाला येईल ते उत्तर सांगतोस काय?”
बाळ म्हणाला, “हे अंदाजे उत्तर नाही. मी गणित सोडवले आहे. बरोबर आहे की नाही ते सांगा.”
शिक्षक म्हणाले, “उत्तर तर बरोबर आहे. असे गणित बाकीच्या मुलांना तीनतीनदा कागदावर करूनही बरोबर येत नाही. तू कसे केलेस?”
बाळने आपल्या बोटाने डोक्याला स्पर्श केला. तो म्हणाला, “मी हे गणित डोक्यात सोडवले. मला कागद पेन्सिल न घेता गणिते सोडवायला माझ्या बाबांनी शिकवले आहे.”
हा शाळेतला बुद्धिमान मुलगा बाळ मोठा होऊन सर्व लोकांचा लाडका “लोकमान्य टिळक” बनला.






© BMM Marathi Shala eBook Team

**वाक्यात उपयोग करा:**

| |
|---|
| शिक्षक: शिकवणारे (teacher)<br>------------------------------------------------------------------------------------------------- |
| मेंढ्या: sheep<br>------------------------------------------------------------------------------------------------- |
| चकित: surprised<br>------------------------------------------------------------------------------------------------- |
| तरातरा: जोरात चालणे<br>------------------------------------------------------------------------------------------------- |
| स्पर्श: हात लावणे (touch)<br>------------------------------------------------------------------------------------------------- |

**स्वाध्याय:**

१. गणित न करता उत्तर कोणी सांगितले?

-------------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**२.** शिक्षक बाळला का रागावले?

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**३.** बाळने गणित कसे सोडवले?

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**४.** बाळ मोठेपणी कोणत्या नावाने प्रसिद्ध झाला?

--------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**५.** यापैकी योग्य शब्दाचा उपयोग करून गाळलेल्या जागा भरा:

तरातरा, चकित, अंदाज, स्पर्श, लाडका, गवत

**क)** गाय -------------------- खाते.

**ख)** उद्या पाऊस पडेल असा -------------------- आहे.

**ग)** तो रागाने -------------------- चालत पुढे आला

**घ)** बर्फाला -------------------- केला की गार वाटते.

**च)** मी माझ्या बाबांचा -------------------- आहे.

**६.** खालील शब्द नाम, सर्वनाम की विशेषनाम आहेत ते शब्दापुढे लिहा



© BMM Marathi Shala eBook Team

मी ----------------------------- हे -----------------------------

शिक्षक ---------------------------- मुलगा -----------------------------

टिळक ----------------------------- डोके -----------------------------

जमीन -----------------------------

**समाविष्ट अभ्यासक्रम:**

**आपण काय शिकलो:** नाम, सर्वनाम, लोकमान्य टिळक

**प्रश्न:** अशा आणखी दोन बुद्धीमान माणसांच्या गोष्टी ऐका.
भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढलेल्या दोन देशभक्तांबद्दल माहिती सांगा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**या गोष्टीच्या अनुषंगाने खालील माहिती वाचा:**



© BMM Marathi Shala eBook Team

लोकमान्य टिळकानी आयुष्यभर भारत देश स्वतंत्र होण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सव सुरु केले आणि ब्रिटीश सरकार विरुध्द सर्व लोकांमध्ये असंतोष निर्माण केला. अनेक पुस्तके लिहिली. दोन शाळा चालू केल्या आणि दोन वर्तमानपत्रे सुरू केली. त्यांना सरकारने ब्रह्मदेशात मंडाले येथे तुरुंगात ठेवले. त्यांची घोषणा होती, “स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि तो मी मिळवणारच”. १ आगस्ट १९२० साली त्यांचा मृत्यू झाला.



© BMM Marathi Shala eBook Team

# २८. अशी ही नाती

आजोबांच्या ७५ व्या वाढदिवसाला बरेच पाहुणे जमले होते. अमेरिकेहून नील खास त्यासाठी आला होता. तिथे एखादीला ताई म्हणावं तर ती मावशी असायची. एखाद्याला मामा म्हणावं तर तो दादा असायचा. त्यामुळे नीलचा प्रचंड गोंधळ झाला होता. शेवटी त्याने आजोबाना विचारले,

“आजोबा, ही नाती काही माझ्या लक्षात येत नाहीत. सांगता का जरा?”

मग आजोबांनी एका एका पाहुण्याला पुढे बोलावून ओळख करून द्यायला सुरूवात केली,

**आजोबा**: हा सुहास तुझा मामा, म्हणजे तुझ्या आईचा भाऊ हे तुला माहिती आहे. मग त्याची आई तुझी कोण?”

**नीलः** ती माझी आजी, कारण ती माझ्या आईची पण आई आहे.

**आजोबाः** सुहास तुझा मामा आणि सुहासची बायको तुझी मामी. होय ना? आता मला सांग तुझ्या बाबांचा भाऊ तुझा कोण?

**नीलः** तो काका हे मला माहित आहे आणि त्याची बायको ती माझी काकू,

**आजोबाः** तुझ्या बाबांची बहीण ती तुझी आत्या. आणि तुझ्या आईची बहीण ती तुझी मावशी.

**नीलः** बरं मग या आत्याची मुलगी, मावशीची मुलगी किंवा मामाची मुलगी माझी कोण?

**आजोबाः** आत्याची मुलगी आतेबहीण, मामाची मुलगी मामेबहीण आणि मावश्ीची मुलगी ती मावसबहीण.

**नीलः** आणि मुलगा असेल तर आतेभाऊ, मामेभाऊ आणि मावसभाऊ ना? पण मी या सगळ्यांना आजवर कझिन म्हणत होतो.

**नीलः** हो, नक्की. आणि काकाची मुलगी काकेबहीण ना?

**आजोबा**: नाही. काकाची मुलगी तुझी चुलतबहीण.

**आजोबाः** बरोबर आता मला सांग, तू तुझ्या मामाचा आणि मामीचा कोण?

**नीलः** कोण?



© BMM Marathi Shala eBook Team

**आजोबा**ः भाचा. आत्याचा पण भाचा आणि मावशीचा पण भाचा.

**नील**: मग माझ्या काकाचा मी कोण? भाचाच का?

**आजोबा**ः नाही. इथे पण काकाची नाती वेगळी. तुझ्या काकाचा आणि काकूचा तू पुतण्या, तुझी बहीण त्यांची पुतणी.

**नील**ः मला वाटतं की मी एक फॅमिली ट्री तयार करतो म्हणजे ही सगळी गुंतागुंत माझ्या लक्षात राहील.



**वाक्यात उपयोग करा:**

| |
|---|
| प्रचंड: खूप मोठा<br>------------------------------------------------------------------------------------------------ |
| गोंधळ: confusion<br>------------------------------------------------------------------------------------------------ |
| लक्षात: remember<br>------------------------------------------------------------------------------------------------ |
| ओळख: introduction<br>------------------------------------------------------------------------------------------------ |



© BMM Marathi Shala eBook Team

**स्वाध्याय:**

**१.** या धड्यात कोणकोणती नाती आली आहेत ? त्यांची English नावे लिहा.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

**२.** या शब्दांचा वाक्यात उपयोग करा.

माझा --------------------------------------------------------------------------

माझ्या ------------------------------------------------------------------------

तुझा --------------------------------------------------------------------------

तुझी --------------------------------------------------------------------------

तिची --------------------------------------------------------------------------

तिच्या ------------------------------------------------------------------------

**३.** गाळलेले शब्द भरा.

**क)** माझ्या बहिणीचा मुलगा तो माझा -----------------------

**ख)** माझ्या ----------------------- बहीण ती माझी मावशी

**ग)** माझ्या बाबांची बहीण ती माझी -----------------------

**घ)** माझ्या आत्याचा मुलगा तो माझा -----------------------

**च)** माझ्या मामेभावाची आई ती माझी -----------------------

**छ)** माझ्या वडिलांच्या भावाची आई ती माझी -----------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**४.** संधीफोड करा

पाहुणी ---------------------------

मावशी ---------------------------

मामेबहीण---------------------------

**शिक्षकांसाठी:**

**समाविष्ट अभ्यासक्रम:**

**आपण काय शिकलो:** नाती, संधीफोड

**प्रश्न:** या धड्यात आलेले नातेवाईक माहीत अहेत का?

फॅमिली ट्री तयार करा. सर्व नाती मराठीत लिहा. त्याचे एक presentation करा.



© BMM Marathi Shala eBook Team

# २९. चला पाहू या ध्रुव तारा

**प्रकाशः** आर्या, आज रात्री आमच्या गच्चीत येशील का? माझे श्रीकृष्णकाका आले आहेत, ते आपल्याला ध्रुव तारा दाखवणार आहेत. शिवाय आमची आई आईस्क्रीम पण करणार आहे.



**आर्याः** मी तर नक्कीच येते. मी माझ्या दोन मैत्रिणीना पण आणते.

**प्रकाशः** बरं या. मी वाट पाहातो.


(रात्री नऊ वाजता प्रकाश, त्याचा भाऊ अर्जुन, आर्या आणि तिच्या दोन मैत्रिणी वृन्दा आणि चंद्रिका प्रकाशच्या गच्चीत जमले. प्रकाशचे आई-बाबा आणि श्रीकृष्णकाका होतेच.)



**काकाः** आज आकाश अगदी स्वच्छ आहे. मी एक दुर्बिण आणली आहे. त्यातून छान दिसेल. बघा बरं आकाशात.

**प्रकाशः** काका, खूप तारे दिसत आहेत, पण काका, ध्रुव तारा कुठे आहे?

**काकाः** प्रत्येकाने दुर्बिण घ्या आणि मी सांगतो तिथे बघा, पतंगाच्या आकारात असलेले चार तारे आणि पतंगाची शेपटी असावी असे तीन तारे पाहिलेत का? त्यातल्या दोन ता-यांच्या ओळीत तो ध्रुव तारा आहे.




http://www.wpclipart.com/space/stars_universe
Public Domain -- visit WPClipart for original image.
dipper_north_star.jpg



© BMM Marathi Shala eBook Team

**चंद्रिकाः** काका, मला ध्रुव तारा दिसला. थोडा अंधुक आहे पण नक्की तोच आहे. काका, ध्रुव तारा मात्र नेहमी एकाच ठिकाणी दिसतो. होय ना?


**काकाः** अगदी बरोबर, म्हणून तर ध्रुव ता-यावरून उत्तर दिशा ओळखता येते. मित्रांनो, आता मला सांगा, तुम्हाला ग्रह माहित आहेत का? ते कसे फिरतात?

**प्रकाश**: हो तर, आम्ही सूर्यमाला शिकलो आहोत. बुध, गुरू, शुक्र हे सगळे ग्रह आम्हाला माहित आहेत.



**काकाः** आता पुढच्या महिन्यातच सूर्यग्रहण आहे तेव्हा आपण परत जमूया. आता आधी आईस्क्रीमचा समाचार घेऊया. चालेल ना?

**सगळेः** हो चालेल की.



**वाक्यात उपयोग करा:**

| |
|---|
| गच्ची: terrace<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| नक्कीच: certainly<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| दुर्बिण: binocular<br>------------------------------------------------------------------------------------------- |



© BMM Marathi Shala eBook Team

| |
|---|
| |
| स्वच्छ: clear<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| पतंग: kite<br>------------------------------------------------------------------------------------------- |
| आकार: shape<br>------------------------------------------------------------------------------------------- |

**स्वाध्याय:**

१. आकाश पाहायला कोण कोण जमले होते?

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------

२. ध्रुव ताऱ्याची माहिती कोणी दिली?

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**३.** सूर्यमालेतील ग्रहांची नावे लिहा.

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

**४.** या शब्दांचा उपयोग करून वाक्ये बोला / लिहा.

होय ना? ------------------------------------------------------------------------------

अगदी बरोबर --------------------------------------------------------------------------

हो तर

------------------------------------------------------------------------------------

चालेल की ----------------------------------------------------------------------------

**५.** खालील अक्षरांनी बनणारे शब्द लिहा. र असणारी जोडाक्षरे ओळखा.

**क)** आ + ई + स + क + र + ई + म + अ -----------------------------

**ख)** ग + र + अ + ह + अ -----------------------------

**ग)** द + उ + र + ब + इ + ण + अ -----------------------------

**घ)** ध + र + उ + व + अ -----------------------------

**च)** च + अ + द + र + इ + क + आ -----------------------------

**७.** संधीफोड करा

सूर्यमाला ---------------------------------------------------------------

ग्रह ---------------------------------------------------------------

गच्चीत ---------------------------------------------------------------

अंधुक ---------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**७.** ओळखतो, बघितले, दुर्बिण, स्वच्छ हे शब्द वापरून वाक्ये तयार करा

**क)** ओळखतो ------------------------------------------------------------------------

**ख)** बघितले

------------------------------------------------------------------------

**ग)** दुर्बिण ------------------------------------------------------------------------

**घ)** स्वच्छ

------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**समाविष्ट अभ्यासक्रम:**

**आपण काय शिकलो:** र ची जोडाक्षरे, संधीफोड

ध्रुव तारा आणि इतर जवळचे तारे यांची आकृती काढा:

सूर्यग्रहण आणि चंद्रग्रहण कसे होते याची माहिती मिळवा.

“र” ची जोडाक्षरे असलेले आणखी दहा शब्द सांगा.

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

## ३०. गणपती बाप्पा मोरया

पुण्याला आमच्या आजोबांकडे दरवर्षी गणपती आणतात. या वर्षी आम्ही मुद्दाम गणपतीसाठी भारतात गेलो.

दुसऱ्या दिवशी आजोबा म्हणाले, "चला, चला गणपतीचे मखर करूया. कोण कोण मदत करणार आहे मला?"



मग माझा चुलत भाऊ, बहिण अणि शेजारची २-३ मुलं असे आम्ही कामाला लागलो. सगळ्यानी मिळून मखर छान सजवले. त्यानंतर आम्ही सर्वजण टोप्या घालून गणपती आणायला निघालो.



गणपतीच्या शाळेत म्हणजे दुकानात लहानमोठ्या आकाराचे खूप गणपती होते. काही उभे तर काही बसलेले. त्यातही काही उंदरावर बसले होते, तर काही वाघावर, काही चक्क मोरावर बसले होते. आम्ही एक छोटीशी पण छानदार मूर्ती घेतली. एका पाटावर ठेवली, त्यावर आजीने विणलेला एक नक्षीदार रूमाल घातला. “गणपती बाप्पा मोरया” असे रडत आम्ही घरी आलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी जागा झालो ते गूळ-खोब-याच्या गोड खमंग वासानेच. आजी आणि काकू मोदक करीत होत्या. मोदक बघून तोंडाला पाणी सुटले. पण



आजी म्हणाली," अं हं! पूजा केल्याशिवाय मोदक नाही खायचे. आरतीनंतर हवे तेवढे मोदक खायला मिळतील". मग आजोबांनी पूजा केली.आणि सगळ्यांनी दणक्यात आरती म्हटली. .मला कुठे आरती येते? मी फक्त जोरजोरात टाळ्याच वाजवल्या. जेवताना मोदक, बटाट्याची भाजी, मटकीची उसळ, मसालेभात असा बेत होता. मी भरपूर मोदक खाल्ले. गणपतीचे दर्शन घ्यायला आजुबाजूची मंडळी, नातेवाईक येत होते. त्याना प्रसाद द्यायला मी पण मदत करीत होतो.



© BMM Marathi Shala eBook Team

दुस-या दिवशी संध्याकाळी गणपतीचं विसर्जन करायला निघालो. विसर्जन म्हणजे नदीवर जाऊन गणपती पाण्यात बुडवायचा. “गणपतीबाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या” असे ओरडत आम्ही सगळे घराबाहेर पडलो. जाता-जाता घराच्या दारात उभ्या असलेल्या आजीकडे मी पाहिले. ती हळूच डोळे पुसत होती.



**स्वाध्याय:**

**१.** गणपतीचे मखर कोणी केले?

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

**२.** गणपतीच्या दर्शनाला कोण आले होते?

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

**३.** गणपती विसर्जन म्हणजे काय?

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

**४.** खालील वस्तू तुमच्या ओळखीच्या आहेत कां? त्यांचा वापर कोठे होतो?



© BMM Marathi Shala eBook Team

विड्याची पानं ---------------------------------------------------------------------------

कुंकू ---------------------------------------------------------------------------------

गूळ ---------------------------------------------------------------------------------

**५.** खालील शब्दांचे इंग्लीशमध्ये अर्थ सांगा.

बाळगोपाळ मंडळी ---------------------------------------------------------------------

नातेवाईक --------------------------------------------------------------------------

उत्साह ------------------------------------------------------------------------------

बुद्धी-------------------------------------------------------------------------------
-

मूर्ती

--------------------------------------------------------------------------------

पूजा

--------------------------------------------------------------------------------

**६.** खालील प्रत्येक शब्दाचे अनेकवचन सांगा

आरती ---------------------- मोदक ----------------------

मी ---------------------- नदी ----------------------

**७.** खालील वाक्यातील ठळक शब्द चुकीचा आहे. तो बरोबर करून वाक्य लिहा.

मी मूर्ती पाटावर <u>ठेवला</u>. --------------------------------------------------------

गणपती उंदरावर <u>बसले</u>. --------------------------------------------------------

मी गणपतीचा मखर <u>सजवली</u>. --------------------------------------------------------



© BMM Marathi Shala eBook Team

**८.** खालील शब्दांपैकी सर्वनामांच्या खाली रेघ मारा.
मामी, मी, काकू, आम्ही, तू, गणपती

**समाविष्ट अभ्यासक्रम:**

**आपण काय शिकलो:** सर्वनामे, क्रियापद, गणपती

**प्रश्न:** आजी डोळे का पुसत होती?

________________________________________

________________________________________

________________________________________

गणपतीची आरती पाठ करून घ्या. इतर महत्वाच्या सणांची माहिती करुन घ्या
गणपतीची एखादी गोष्ट सांगा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________



© BMM Marathi Shala eBook Team

**गणपतीची मूर्ती तयार करण्यची कृती:**

https://www.youtube.com/watch?v=sdfIBvoMYqw



© BMM Marathi Shala eBook Team

## ३१. स्वराज्याची शपथ आणि तोरणा विजय

(महाराष्ट्राच्या इतिहासातील शिवाजी महाराजांची एक गोष्ट )



पुण्याजवळ असलेल्या रायरेश्वराच्या मंदिरात १६ वर्षांचा शिवबा शिरला. त्याच्या बरोबर होते आजूबाजूच्या खोऱ्यातले त्याचे सवंगडी, कान्होजी जेधे, तान्हाजी मालुसरे, सूर्याजी मालुसरे, येसाजी कंक, बाजी पासलकर आणि इतर. शिवबाने आपला स्वराज्य स्थापनेचा मनसुबा साऱ्यांना सांगितला. जीवाला जीव देणाऱ्या सवंगड्यांनी आनंदाने तो मान्य केला. रायरेश्वराच्या मंदिरातील शिव पिंडीसमोर सर्वांनी एकत्र स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा केली. तो दिवस होता २६ एप्रिल १६४५. आऊसाहेब जिजाबाईंच्या प्रेरणेने आणि पाठिंब्याने शिवराय आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पुण्याजवळच्या प्रचंड गडावर हल्ला करून गड जिंकला. हा गड त्यावेळी आदिलशहाच्या ताब्यात होता, परंतु त्याने ह्या गडाकडे पूर्ण दुर्लक्ष केले होते, आणि त्याचाच फायदा शिवरायांनी घेतला. हा गड जिंकून शिवरायांनी जणू स्वराज्याचे तोरणच बांधले म्हणून या गडाचे नाव **तोरणा** ठेवण्यात आले.

कथा : सौ कादंबिनी ताई धारप



© BMM Marathi Shala eBook Team

**स्वाध्याय:**

**१.** हिंदवी स्वराज्याची प्रेरणा शिवरायांना कोणी दिली?

२. शिवबाने हिंदवी स्वराज्याची शपथ कोणत्या दिवशी व कुठे घेतली?

३. शिवबाच्या काही सहकाऱ्यांची नावे सांगा.

**४.** शिवरायांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी सर्वप्रथम कोणत्या गडावर हल्ला केला?

**५.** हा गड कोणाच्या ताब्यात होता?



© BMM Marathi Shala eBook Team

**६.** गडाचे नाव तोरणा असे का ठेवले?

_____________________________________________________________________

_____________________________________________________________________



© BMM Marathi Shala eBook Team

## ३२. मिठाचा सत्याग्रह

भारताच्या स्वातंत्र्यासाठी झालेल्या लढ्यात महात्मा गांधींचा फार मोठा वाटा आहे. त्यांचे संपूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी. पण सारे जग त्यांना महात्मा गांधी म्हणून ओळखते.

इंग्रजांविरुद्ध लढण्याचे त्यांचे शस्त्र होते सत्याग्रह. शत्रूने आपले कितीही हाल केले तरी चालेल पण आपले खरे असलेले म्हणणे सोडायचे नाही म्हणजे सत्याग्रह .

१९३० साली इंग्रज सरकारने मिठासारख्या सर्वांना आवश्यक असलेल्या वस्तूवर कर बसवला. गांधीजींनी ठरवले की याविरूद्ध सत्याग्रह करायचा. गुजरात प्रांतातील दांडी येथे हा सत्याग्रह करायचा ठरला. हजारो बायका, पुरूष या सत्याग्रहात गांधीजींबरोबर होते. ही मिरवणूक दांडीला जात होती. इंग्रज सरकारचे शेकडो पोलीस लोकांना अडवत होते, पोलिसांनी लोकांवर लाठीमार केला, त्यांच्यावर गोळ्या झाडल्या, पण तरीही मिरवणूक पुढे जात राहिली. कुणाचे हात पाय मोडले, जखमा झाल्या, पण तरीही लोकांनी माघार घेतली नाही. या मिरवणुकीत गांधीजी सर्वात पुढे होते. शेवटी दांडीच्या समुद्रावर जाऊन तिथे तयार होत असलेले मीठ गांधीनी चिमूटभर उचलले, इतरांनीही त्यांचे अनुकरण केले. अखेरीस सरकारला माघार घ्यावी लागली आणि मिठावरील कर रद्द करावा लागला.

असे हे आपले गांधीजी.





© BMM Marathi Shala eBook Team

**समाविष्ट अभ्यासक्रम:**

**आपण काय शिकलो:** व्यक्ती परिचय (महात्मा गांधी)

**प्रश्न:** ही गोष्ट वापरून महात्मा गांधींची ओळख करून घ्या.



© BMM Marathi Shala eBook Team

## ३३. रंगाचे गाणे

लाल रंग हा टोमॅटोचा
पिवळा आहे सूर्यफुलाचा
असे ढगांचा पांढरा आणिक
आकाशाचा निळा निळा ||

सूर्यकिरण सोनेरी असती
चंद्र चांदणे चंदेरी
काळा काळोख होतो
जेव्हा असते रात्र अंधारी ||

गवताचा असतो हिरवा अन
असे जांभळा वांग्याचा
हॅलोवीनला हसणारा तो
वाटोळा केशरी भोपळा ||

आभाळामधीं दिसेल जेव्हा
इंद्रधनू ते जादूचे
आपण अपुले गाणे गाऊ
रंगांचे हे गमतीचे ||

कविता : सौ. अश्विनी ताई देवधर

**प्रश्न**

१ हे गाणे कसले आहे ?

---

२ कुठले रंग गाण्यात आहेत ?

---

३ काळोख कधी होतो ?

---

४ पांढऱ्या रंगाच्या चार वस्तू सांगा.

---

५ हिरवा रंग कसला असतो ?

---

जोड्या जुळवा

जांभळी , लाल, चंदेरी, केशरी, पिवळा

| | | | |

( काळोख, सूर्यफूल, चंद्र, टोमॅटो, भोपळा, वांगे, आकाश )

© BMM 2.0 Marathi Shala WorkBook Team

## ३४. वाळूचा किल्ला अवांतर वाचन

आज आरव आणि रिया खूप आनंदात होते. आज त्यांचे आईबाबा त्यांना समुद्रावर घेऊन जाणार होते.
कित्ती तरी दिवस त्यांना दोघांना समुद्रावर जाऊन वाळूत किल्ला करायचा होता. पण कधी आई कामात तर कधी बाबा !!

शिवाय आरव आणि रियाच्या कित्तीतरी गोष्टी चालू असतात. शाळा तर असतेच पण आरव चा गाण्याचा क्लास, रियाचा पियानो, त्यांचं दोघांचं कुमॉन, शिवाय पोहायला पण जायचं असतं बाबांबरोबर !! त्यांना पण वेळ पुरत नाही कधी कधी!!

म्हणूनच आज त्यांना खूपच छान वाटत होतं. किल्ला करायची सगळी तयारी झाली होती. वेगवेगळ्या आकाराच्या बादल्या, थापटणे, छोटा खेळातला रेक, शिवाय किल्ल्यावर लावायला झेंडा, खरं म्हणजे आरवला किल्ल्यावर झू पण करायचा होता, हळूच त्याचे खेळातले प्राणी आणि शिवाय त्याच्या टॉय कार्स पण घेत होता तो. पण रियाने लगेच आगाऊ पणा करून ते परत ठेवायला लावलं. शिवाय म्हणाली, तू हरवशील !!

पण एकदाचे ते समुद्रावर पोहोचले. हा नको, तो नको करत करत शेवटी एक मस्त स्पॉट मिळाला.
अगदी जश्शी हवी तश्शी ओलसर वाळू होती. मग लागले दोघे कामाला.

आधी वाळू खोदून काढली. ते करता करता एक डोंगर झाला त्या डोंगरात दोघांनी दोन्ही बाजूनी हाताने खोदून बोगदा केला. त्या बोगद्यातून एकमेकाला हॅलो करून झालं. गुप्त संदेश पाठवून झाले. किल्ला किती मोठ्ठा करायचा, त्याला नाव काय द्यायचं ह्यावर गंभीर चर्चा झाली.

मग बादल्या भरभरून वेगवेगळे बुरुज केले. एका बाजूला सर्वात उंच बुरुज झाला. सगळ्या बाजूंनी पाणी साठवायला खंदक झाला. एक मोठा लेगोचा तुकडा वापरून किल्ल्याचा मुख्य दरवाजा झाला.

रंगीत पुठ्ठयाचे तुकडे वापरून छोटे झरोके झाले. एवढंच नाही तर बाजूच्या सर्वात उंच बुरुजावर सोनेरी झिरमिळ्या लावल्या गेल्या. किल्ला एकदम राजेशाही दिसायला हवा म्हणून!!

इकडे तिकडे धावपळ करून छोटे शिंपले गोळा करण्यात आले. तो किल्ल्याचा खजिना होता. तो एका लहान पेटीत ठेवून लपवण्यात आला. इतकं सगळं झाल्यावर दोघे दमून गेले होते. आता उभं राहून दोघांनी आपल्या किल्ल्याकडे बघितलं. एकच काम राहिलं होतं. सोनेरी बुरुजावर झेंडा लावणे. तो लावला.

वा वा किती सुंदर किल्ला दिसत होता!!

आरव आणि रियाला खूप खूपच आनंद झाला होता. आता घरी जायची वेळ झाली होती. वाटेत पिझ्झा खाऊन ते सगळे घरी पोहोचले.

रात्री झोपल्यावर स्वप्नातसुद्धा त्यांना तो किल्ला दिसत राहिला.

कथा : सौ अश्विनी ताई देवधर

**प्रश्न**

१. गोष्टीतल्या मुलांची नावं काय ?

___________________________________________

२. ते काय काय करतात ?

_____________________________________________________

३. तुम्ही कुठल्या छंदवर्गाला जाता ?

________________________________________

४. तुमच्या आवडत्या ठिकाणचे वर्णन करा. किंवा तुम्ही आई बाबांबरोबर केलेले प्रवासाचे वर्णन लिहा.

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

**गाळलेल्या जागा भरा :-**

१. आज त्यांचे आईबाबा त्यांना –---------- घेऊन जाणार होते.

२. –------ करायची सगळी तयारी झाली होती.

३. त्या –------- एकमेकाला हॅलो करून झालं.

४. किल्ला एकदम –------- दिसायला हवा म्हणून !!

५. तो किल्ल्याचा –------ होता.

**इंग्रजी प्रतिशब्द लिहा**

| | | |
|---|---|---|
| वाळूचा किल्ला | गुप्त संदेश | उंच बुरुज |
| मुख्य दरवाजा | छोटे शिंपले | खजिना |
| झेंडा | | |

# ३५. रामायणातील गोष्टी

## **१. मला चंद्र हवा**

राम, लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न ही दशरथ राजाची चार मुले, ही मुले लहान असतानाची गोष्ट.



एका संध्याकाळी लहानगा राम राजवाड्याच्या गच्चीत खेळत होता. त्याने आकाशाकडे पाहिले तेव्हा त्याला चंद्र दिसला,. तो आईला म्हणाला," आई मला तो चंद्र खेळायला हवा आहे. आई म्हणाली, "अरे बाळा, तो चंद्र आपल्यापासून खूप लांब आहे, तो आणता येणार नाही." पण राम काही ऐकेना. सगळ्यांनी त्याची समजूत घातली. पण त्याचा उपयोग झाला नाही.  शेवटी सुमन्त नावाच्या प्रधानाने एक युक्ती केली.एक आरसा आणला. त्यात चंद्र दिसेल असा तो धरला. रामाला आरशात चंद्र दिसला. चंद्र मिळाला असे वाटून राम खूष झाला.

~~~~~

## **२. शबरी**

राम, लक्ष्मण आणि सीता वनवासाला गेले तेव्हाची गोष्ट. त्यांनी तेथे एक झोपडी बांधली व राहू लागले. त्या वनातील मंडळी त्यांना भेटायला येत असत. त्या वनात एक शबरी नावाची बाई राहात होती. एक दिवस तिने रामाला आपल्या झोपडीत बोलावले. राम आले आणि बसले. शबरीने त्यांच्या गळ्यात रानफुलांच्या माळा घातल्या आणि बोरे खायला दिली. ती बोरे अर्धवट खाल्लेली दिसत होती.

© BMM 2.0 Marathi Shala WorkBook Team 
~~~~~

शबरी म्हणाली, “ही बोरे पाखरांनी खाल्लेली नाहीत. तुम्हाला आंबट बोरे कशी दयायची म्हणून यातले प्रत्येक बोर मी चाखून पाहिले आहे. जी बोरे गोड निघाली तीच आपल्याला देत आहे. आपण ती खावी”. शबरीची भक्ती पाहून राम प्रसन्न झाले. शबरीने उष्टी केलेली बोरे त्यांनी आनंदाने खाल्ली.



~~~~~

**३. श्रावण बाळाची गोष्ट**

एक मुलगा होता. त्याचे नाव श्रावण. त्याचे आई वडील आंधळे होते. आईवडिलांची



सर्व कामे तो करीत असे. एकदा तो आई वडिलांना घेऊन काशीयात्रेला निघाला. आई वडिलांना त्याने कावडीत बसविले होते. प्रवासात असताना आई वडिलांना तहान लागली. ती संध्याकाळची वेळ होती. त्याने कावड खाली ठेवली आणि तो पाणी आणण्यासाठी नदीवर गेला. त्याने नदीच्या पाण्यात आपली घागर बुडवली. तेव्हा बुड-बुड असा आवाज झाला. तेवढ्यात सूं सूं करीत एक बाण आला आणि श्रावणाच्या छातीत शिरला. ‘आई ग!‘ असे ओरडत श्रावण जमिनीवर पडला. त्याचे ओरडणे ऐकून समोरच्या झाडीत असलेला दशरथ राजा धावत आला. कोणी जनावरच पाणी प्यायला नदीवर
~~~~~

आले आहे. त्यानेच हा बुड बुड आवाज केला असावा असे वाटल्यामुळे त्याने तो बाण सोडला होता. दशरथ म्हणाला, “अरेरे, बाळा, मला क्षमा कर”. श्रावण म्हणाला, “ आता मी काही वाचणार नाही. पलिकडे माझे आंधळे आईबाप आहेत. त्यांना फार तहान लागली आहे, त्यांना पाणी नेऊन पाज. म्हणजे मी सुखाने मरतो”

लवकरच श्रावणाने प्राण सोडला. दशरथाने आई वडिलांना पाणी नेऊन दिले. अपराधाच्या भावनेने तो काही बोलला नाही. आई म्हणाली, “बाळ, तू बोलला नाहीस तर आम्ही पाणी पिणार नाही“. शेवटी दशरथाने सर्व हकीकत सांगितली. श्रावणाचे वडील म्हणाले, “ तू आमचा पुत्र मारलास. तू ही पुत्रशोकानेच मरशील.’ आणि श्रावणाच्या आई वडिलांनी प्राण सोडला.



**समाविष्ट अभ्यासक्रम:**

**आपण काय शिकलो:** रामायण

**प्रश्न:** ह्या गोष्टींच्या आधारे रामायणाबद्दल माहिती सांगा.
रामायणातील इतर गोष्टी सांगता येतील?

## परिशिष्ट: मुळाक्षरे

**स्वर**

अ आ इ ई उ ऊ ए ऐ ओ औ अं अः

---

---

**व्यंजने**

क ख ग घ ङ

---

च छ ज झ ञ

---

ट ठ ड ढ ण

---

त थ द ध न

---

प फ ब भ म

---

य र ल व श

---

ष स ह ळ क्ष

## परिशिष्ट: बाराखडी

अ आ इ ई उ ऊ ए ऐ ओ औ अं अः

| स्वर | | चिन्ह |
|---|---|---|
| अ | | |
| आ | काना | ◌ा ◌ा |
| इ | पहिली (ऱ्हस्व) वेलांटी | ◌ि ◌ि |
| ई | दुसरी (दीर्घ) वेलांटी | ◌ी ◌ी |
| उ | पहिला(ऱ्हस्व) उकार | ◌ु ◌ु |
| ऊ | दुसरी (दीर्घ) उकार | ◌ू ◌ू |
| ए | एक मात्रा | ◌े ◌े |
| ऐ | दोन मात्रा | ◌ौ ◌ै |
| ओ | काना आणि एक मात्रा | ◌ो ◌ो |
| औ | काना आणि दोन मात्रा | ◌ौ ◌ौ |
| अं | अनुस्वार | ◌ं ◌ं |
| अः | विसर्ग | ◌ः ◌ः |

| अ | आ | इ | ई | उ | ऊ | ए | ऐ | ओ | औ | अं | अः |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ◌ा | ◌ि | ◌ी | ◌ु | ◌ू | ◌े | ◌ौ | ◌ो | ◌ौ | ◌ं | ◌ः |
| क | का | कि | की | कु | कू | के | कै | को | कौ | कं | कः |
| ख | खा | खि | खी | खु | खू | खे | खै | खो | खौ | खं | खः |
| ग | गा | गि | गी | गु | गू | गे | गै | गो | गौ | गं | गः |
| घ | घा | घि | घी | घु | घू | घे | घै | घो | घौ | घं | घः |
| च | चा | चि | ची | चु | चू | चे | चै | चो | चौ | चं | चः |
| छ | छा | छि | छी | छु | छू | छे | छै | छो | छौ | छं | छः |
| ज | जा | जि | जी | जु | जू | जे | जै | जो | जौ | जं | जः |
| झ | झा | झि | झी | झु | झू | झे | झै | झो | झौ | झं | झः |
| ट | टा | टि | टी | टु | टू | टे | टै | टो | टौ | टं | टः |
| ठ | ठा | ठि | ठी | ठु | ठू | ठे | ठै | ठो | ठौ | ठं | ठः |
| ड | डा | डि | डी | डु | डू | डे | डै | डो | डौ | डं | डः |
| ढ | ढा | ढि | ढी | ढु | ढू | ढे | ढै | ढो | ढौ | ढं | ढः |
| ण | णा | णि | णी | णु | णू | णे | णै | णो | णौ | णं | णः |
| त | ता | ति | ती | तु | तू | ते | तै | तो | तौ | तं | तः |
| थ | था | थि | थी | थु | थू | थे | थै | थो | थौ | थं | थः |
| द | दा | दि | दी | दु | दू | दे | दै | दो | दौ | दं | दः |
| ध | धा | धि | धी | धु | धू | धे | धै | धो | धौ | धं | धः |
| न | ना | नि | नी | नु | नू | ने | नै | नो | नौ | नं | नः |
| प | पा | पि | पी | पु | पू | पे | पै | पो | पौ | पं | पः |
| फ | फा | फि | फी | फु | फू | फे | फै | फो | फौ | फं | फः |
| ब | बा | बि | बी | बु | बू | बे | बै | बो | बौ | बं | बः |
| भ | भा | भि | भी | भु | भू | भे | भै | भो | भौ | भं | भः |
| म | मा | मि | मी | मु | मू | मे | मै | मो | मौ | मं | मः |

| अ | आ<br>◌ा | इ<br>ि◌ | ई<br>◌ी | उ<br>◌ु | ऊ<br>◌ू | ए<br>◌े | ऐ<br>◌ौ | ओ<br>◌ो | औ<br>◌ौ | अं<br>◌ं | अ:<br>◌ः |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| य | या | यि | यी | यु | यू | ये | यै | यो | यौ | यं | यः |
| र | रा | रि | री | रु | रू | रे | रै | रो | रौ | रं | रः |
| ल | ला | लि | लि | लु | लू | ले | लै | लो | लौ | लं | लः |
| व | वा | वि | वी | वु | वू | वे | वै | वो | वौ | वं | वः |
| श | शा | शि | शी | शु | शू | शे | शै | शो | शौ | शं | शः |
| ष | षा | षि | षी | षु | षू | षे | षै | षो | षौ | षं | षः |
| स | सा | सि | सी | सु | सू | से | सै | सो | सौ | सं | सः |
| ह | हा | हि | ही | हु | हू | हे | है | हो | हौ | हं | हः |
| ळ | ळा | ळि | ळी | ळु | ळू | ळे | ळै | ळो | ळौ | ळं | ळः |
| क्ष | क्षा | क्षि | क्षी | क्षु | क्षू | क्षे | क्षै | क्षो | क्षौ | क्षं | क्षः |
| ज्ञ | ज्ञा | ज्ञि | ज्ञी | ज्ञु | ज्ञू | ज्ञे | ज्ञै | ज्ञो | ज्ञौ | ज्ञं | ज्ञ |

| अ | आ<br>◌ा | इ<br>ि◌ | ई<br>◌ी | उ<br>◌ु | ऊ<br>◌ू | ए<br>◌े | ऐ<br>◌ौ | ओ<br>◌ो | औ<br>◌ौ | अं<br>◌ं | अ:<br>◌ः |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | | | | | | | | | | | |
| ख | | | | | | | | | | | |
| ग | | | | | | | | | | | |
| घ | | | | | | | | | | | |
| च | | | | | | | | | | | |
| छ | | | | | | | | | | | |
| ज | | | | | | | | | | | |
| झ | | | | | | | | | | | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ट | | | | | | | | | | | |
| ठ | | | | | | | | | | | |
| ड | | | | | | | | | | | |
| ढ | | | | | | | | | | | |
| ण | | | | | | | | | | | |
| त | | | | | | | | | | | |
| थ | | | | | | | | | | | |
| द | | | | | | | | | | | |
| ध | | | | | | | | | | | |
| न | | | | | | | | | | | |
| प | | | | | | | | | | | |
| फ | | | | | | | | | | | |
| ब | | | | | | | | | | | |
| भ | | | | | | | | | | | |
| म | | | | | | | | | | | |
| य | | | | | | | | | | | |
| र | | | | | | | | | | | |
| ल | | | | | | | | | | | |
| श | | | | | | | | | | | |
| ष | | | | | | | | | | | |
| स | | | | | | | | | | | |
| ह | | | | | | | | | | | |
| ळ | | | | | | | | | | | |
| क्ष | | | | | | | | | | | |
| ज्ञ | | | | | | | | | | | |

© BMM 2.0 Marathi Shala WorkBook Team

## परिशिष्ट: जोडाक्षरे

**१)** मूळ अक्षरास तेच अक्षर जोडणे - ट्ट ठ्ठ न्न प्प च्च ल्ल
घट्ट मठ्ठ अन्न गप्पा चक्क गल्ली पत्ता (अर्धा त + त = त्त)

**२)** उभी रेघ नसलेले अक्षर + दुसरे मूळ अक्षर जोडणे
ट ठ ड द ल ह ळ छ
मोठ्याने केल्याने साड्या गाड्या ह्याने काट्याने गोळ्या

**३)** उभी रेघ असलेले अक्षर + दुसरे मूळ अक्षर जोडणे
क ख ग घ च ज झ प म - रक्त मग्न शब्द अभ्यास मिरच्या म्हैस अन्विता अरण्य पिशव्या तथ्य चष्मा हास्य

**४)** र अक्षराचं जोडाक्षर : अर्धा र + व्यंजन

- अक्षरावर रेफ (रफार): सूर्य वर्ष गर्व सर्दी पर्व हर्ष निर्णय पर्वत
- एकाच शब्दात दोन रफार : पूर्वार्ध धर्मार्थ सर्वार्थाने
  (फोड: पू + अर्धा र + वा + अर्धा र + ध)
- अक्षरामागे अर्धचंद्र: कु-हाड दुस-याला पु-या त-हा गु-हाळ पाय-या हि-यांची

**५)** अर्धे व्यंजन + र

- अक्षराला तिरकी रेघ (पदेन) - वक्र चक्र पत्र मित्र समग्र ग्राम सर्वत्र कुत्रा छत्री भित्रा चंद्र प्रकार दरिद्र, रुद्र प्रक्रिया (एकाच शब्दात दोन पदेन)
- अक्षराखाली दोन पाय - ड्रील ड्रायव्हर टुंड्रा सिंड्रेला ट्रंक ट्राम ट्रे राष्ट्र महाराष्ट्र राष्ट्रगीत

- अर्धे व्यंजन त + र = त्र,    गायत्री त्रास त्रिशूल त्रिगुण त्रोटक नेत्र त्रिकोण
- अर्धे व्यंजन श + र = श्र,    श्री श्रावण श्रुती श्रीमती श्रेय अश्रु

**ऋ ची मात्रा**:  ृ  (ऋ हा स्वर आहे.)
व्यंजन + ऋ स्वर = व्यंजनाखाली हे चिह्न ृ
उदा. ग + ृ + ह = गृह
हृदय मृग संस्कृत वृत्त गृह पृथ्वी कृती कृपा तृषा

**अक्षरावर अर्धचंद्र**
टॉम टोमॅटो डॉक्टर मॉनिटर हॅट

© BMM 2.0 Marathi Shala WorkBook Team 

© BMM 2.0 Marathi Shala WorkBook Team 